31 Dec 2018.

टू मच वा नेव्ह नसलेले असे कलेचे माफक कार्य कोणते असते तेही कृपया स्पष्ट करावे.

विचारसरणीकडून अपेक्षा केली जाते ते काय असते ? विचारसरणी एकरेषीय आणि बंदिस्त असते -- कलेचा आवाका परिपूर्णतेचा असतो !

धर्म आणि विचारसरण्या दोन्ही स्पर्धेत असतात -- माणूस बदलण्याच्या बाबतीत दोन्ही कुचकामी आहेत -- माणूस बदलणे हेच मुख्य -- तिकडे लक्ष न देता व्यवस्था बदलण्याची आकांक्षा बाळगणे फोल !

अस्मितेत परिवर्तन होणे म्हणजेच पराभव -- ज्यातून संघर्ष आणि नाशच निर्माण होतो त्याला ' विजय ' कसे म्हणणार ? आणि संघटित धर्माचा पराभव हे अनेकांचे आकलन आहे --

एखाद्या वा दुसऱ्या विचारसरणीचा पराभव असे नव्हे -- एकूणच विचारसरणी या प्रकाराचाच पराभव -- अंशात्मक व तुटक असल्यामुळे आणि समग्रतेचा आवाका नसल्यामुळे --

इथे अनेकांकडून समग्र भान व्यक्त होत राहण्याच्या शक्यता अधिक आहेत -- एखादा एरवीचा गुन्हेगारही कलानिर्मिती करताना समग्र भानाच्या शक्यता समोर आणू शकतो -- तरीही, तुम्ही म्हणता तशा मठ स्थापन होण्याच्या शक्यता इथेही आहेतच --

कला हीही एक पूर्ण शक्यता आहे -- जगण्याचे समग्र भान येणे म्हणजेच परिवर्तन वा क्रांती -- कला हा आता ' उरलेला ' मार्ग आहे -- यात अमुकच एक ' अधिकारी ' निर्माण होत नाही -- सत्ता नाही -- हे भान व्यक्त होणे हे व्यक्तिगत वा सामूहिक नसते -- त्यामुळे ' सत्तेच्या ' गैरवापराच्या शक्यता नाहीत --

विसारसरणी, धर्म, कला या जगणे समजण्याच्या शक्यता आहेत -- धर्म आणि विचारसरणी अपयशी झालेल्या आहेत -- कला पूर्ण जगण्याचा आवाका घेणारी असते -- वेगळी काढणे नाहीच --

परिपक्वतेचे भान व्यक्त होणे, ते एकमेकांत झिरपणे यासाठी आता कलाच महत्त्वाची ठरेल -- विचारसरणी वा धर्म नाही -- धर्मांच्या अस्मिता झालेल्या आहेत !

वास्तव आणि फिक्शन दोन्हींमध्ये समृद्ध आशय असू शकतो. काफ्काची ' ट्रायल ' व्यक्तिसापेक्ष की वस्तुसापेक्ष ? आणि नेमाड्यांचा वास्तववाद कुठे व्यक्तिनिरपेक्ष आहे ?

विचार आला की असणे सुरू होणार --

अरे मग होऊन जाऊ देत तुझे एकदोन षटकार !

अलिबागला राज कुलकर्णी यांनी कादरखानच्या संवादांनी खूप धमाल केली होती -- ते नाहीयत का एफबीवर ?

" आज भी मै फेके हुए पैसे नही उठाता -- " -- हे कुणीच कसे नाही दिले ?

कितने आदमी थे -- हाही संवाद आहे -- याला ते, " दो -- " असे उत्तर देतात.

" ये पोस्ट और सब कॉमेंटस सेव्ह करके रखो मित्र ! डिप्रेशनमे काम आयेंगे ! "

" आधे मेरी दायी तरफ जाओ और आधे मेरी बायी तरफ -- बाकी के मेरे पीछे आओ -- " -- असरानी.

कादरखानचे संवाद आठवत नाहीयत का कुणाला ?

" तूने खुद अपनी मौतको ललकारा है टकले ! "

" भारत माता तुझे कुछ नही आता " - संत परेश रावल.

होय, तोच कॉपी केलाय...अनुमोदन दिलंय..

" तुम जिस स्कूलमे पढ रहे हो वहाँ के हेडमास्टर रह चुके हैं हम ! "
" ये बच्चोंके खेलने की चीज नही -- उंगली कटे तो खून निकल आता है ! "

मला अजून ते समजलेले नाही -- शिक्के मारायची घाई कशाला ?

पाहिले/ऐकले. म्हणजे, कॉर्पोरेटची जी तत्त्वे वा मूल्ये असतील तीच माणसालाही श्रेयस्कर आहेत, अशी आहे का ही मांडणी ? समजा नफेखोरी हे वैशिष्ट्य घेतले तर माणूसही सुख मिळवण्यासाठीच जगतो -- असे काही समांतर शोधणे आहे का हे ?

-- म्हणजे कॉर्पोरेटची जी तत्त्वे व मूल्ये असतील तीच माणसालाही श्रेयस्कर असतील, अशी आहे का ही मांडणी ?

अशा गोष्टींना या नव्या नियतकालिकात आवर्जून वाव मिळावा ! तुम्ही म्हणताय हे मी प्रथमच ऐकतोय -- अशा समीक्षेचा एखादा नमूना इथे देता येईल का ?

Neha Bhandarkar mentioned you in a comment.

Champra Deshpande
Satish Tambe सर
नुकताच मी मराठी साहित्यातून *कॉर्पोरेट परिप्रेक्षातून समीक्षा* हा समीक्षेचा नवा प्रवाह साहित्यात आणला...आजच्या बदलत्या सामाजिक परिप्रेक्षात जगभरातील साहित्यात घातलेलं हे अनमोल आणि नाविन्यपूर्ण योगदान आहे असे मी मानते. कारण.. कॉर्पोरेट चे जगभरात पसरलेले जाळे.आजचा सामान्यातील सामान्य माणूस कॉर्पोरेट चा ग्राहक आहे पर्यायाने कॉर्पोरेटचे अभिन्न अंग देखील. अशा एका पर्वात जगणाऱ्या साहित्यक्षेत्रातील लेखक आणि वाचक दोघांनाही बदलत्या काळाची गरज म्हणून नव्या पिढी साठी नव्या वाटा निर्माण करणे मला गरजेचे वाटते.
पण खंत अशी की श्रोता तर अलभ्यच पण कळस म्हणजे प्रिंट मिडिया ने सुद्धा समीक्षेतील या नव्या प्रवाहाची दखल घेतलेली नाही. बेडकांसारखी मानसिकता असलेल्या या कळपात सर्जक निर्माण झाले तरी त्यांचे पुढे काय? म्हणजे एखादा गॉड फादर असायलाच हवा का? आमच्या सारख्यांचे काय? कुठल्या उत्साहाने मराठी साहित्यात योगदान द्यायचे आणि कुणासाठी?
आवड असलेल्या मित्रांनी 6 डिसेंबर ची माझी पोस्ट बघावी आणि 3 व्हिडिओ ऐकावे अशी विनंती.

Neha Bhandarkar mentioned you in a comment.

त्यासाठीच ही खरी व्याख्या दिली आहे !

Champra Deshpande अगदी मान्य सर. पण सामाजिक किंवा राजकीय वगळता येतील का? शंका आहे. ते ही जगण्याचा मोठा, अविभाज्य भाग आहेत.

मला दुसरी, टोकाची भीती आहे. रंजक, वास्तववादी, विनोदी, गूढ, रहस्य इ. प्रकार म्हणजे साहित्यच नव्हे, ते अतिशय सुमार, असे मानणाऱ्या संपादक मंडळाची मला प्रचंड भीती आहे.

Champra Deshpande commented on Girish Patke's photo.

'आज दुबेजींचा स्मृतिदिन.... केवळ नाटकच नाही तर जगायला शिकवणारा बापमाणूस. आपला अगदी जवळचा प्रत्यक्ष सहवास असला तरी ती व्यक्ती किती उमगली हा प्रश्नच असतो... आता तर फक्त आठवणी....जगणं समृद्ध करणाऱ्या... सलाम दुबेजी... मला न उमगलेले दुबे - गिरीश पतके दुबेजींना जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला तेव्हा मला एक प्रश्न विचारला गेला की पंडित सत्यदेव दुबे यांविषयी तुला नेमके काय वाटते ? प्रश्न तसा अवघड नव्हता मात्र अचानक अवघड वाटायला लागला. परीक्षेसाठी अभ्यास केलेला असावा परंतु पेपरमधल्या कोणत्याच प्रश्नाचे ऊत्तर देता येऊ नये अशी परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळेच या लेखाचे शीर्षक 'मला न उमगलेले दुबे'असे द्यावे हे मनाशी ठरवूनच मी मलाच काही प्रश्न विचारू लागलो. Recall करू लागलो. पंडित सत्यदेव दुबे की दुबेजी की म्हातारा. की आणखीही काही.... क्रिकेट खेळायला म्हणून मुंबईत आलेले आणि नाटकातल्या जादूने नाटकातच रमलेले दुबे; नाटकाने आपल्याला life शिकवले असे म्हणणारे दुबे; जर नाटक केलं नाही तर मी मरेन असं म्हणणारे दुबे; सगळ्यांना शिव्या देणारे, वितंडवाद घालणारे,भांडणारे दुबे; नाटक मरणार असे म्हणणारे दुबे; यापुढे फक्त नाटकच जिवंत राहिल असेही म्हणणारे दुबे; नाटककारांवर, त्यांच्या शब्दांवर, नाटक बोलण्यावर प्रेम करणारे दुबे; सहकलावंताचे बोलणे एकाग्रपणे ऐकायला शिकवणारे दुबे; भाषेतून समाजपरिवर्तनाची इच्छा बाळगणारे दुबे; सतत सुंदरसुंदर श्रीमंत पोरींच्या घोळक्यात असणारे दुबे; आपल्या कलाकारांवर माया करणारे दुबे; त्यांच्यासाठी स्वत:च्या खिशातील पाकीट रिकामे करणारे दुबे; कलाकारांना आपल्या पोतडीतून नाटकाचा मंत्र देणारे दुबे; focus, pitch, volume, recall, श्वासोश्वास यांचा पाठपुरावा करणारे दुबे; तरूण कलाकारांबरोबर सातत्याने काम करणारे आणि त्यांना विचार करायला भाग पाडणारे दुबे ; कलाकाराने कलेच्या बाबतीत स्वार्थी असले पाहिजे असे म्हणणारे दुबे ; नट हरामखोर असतो असेही म्हणणारे दुबे ; नटांनी केवळ आपल्याच पद्धतीच्या नाटकात रमू नये ,ते मोठे व्हावेत म्हणून त्यांच्याशी कडाक्याचे भांडण करून त्यांना निर्दयपणे आपल्यापासून तोडणारे, परंतु त्यांच्या आयुष्यावर बारीक लक्ष ठेवणारे दुबे ; सतत नाटकाचाच विचार करणारे दुबे ; सेन्सॉरबोर्डाच्या बालीश अटीवर'लाल' ऐवजी'निळ्या'डागाचा कलात्मक तोडगा काढणारे दुबे; माझी नाटके पहायला प्रेक्षक आले नाहित तर रिकाम्या प्रेक्षागृहासमोर मी माझी नाटके सादर करीन असे म्हणणारे दुबे; प्रेक्षागृहात कमी प्रेक्षक असतील तर नाराजही

होणारे दुबे; स्वत:च्या नाटकांचा मिनीमम सेट केवळ काळ्याच रंगात पाहणारे दुबे, आपल्या नाटकांतून विशिष्ट पद्धतीचेच फिल्मीसंगीत वाजवणारे दुबे; इतकी नाटके केल्यानंतरही नवीन नाटकावर नवजात बालकाच्या निरागस उत्साहाने आणि कुतुहलाने बोलणारे दुबे; आरएसएसच्या कडक शिस्तीत वाढलेले आणि ती जीवनधारा मानणारे, परंतु त्या विचारसरणीपेक्षा अगदी वेगळा आशय मांडणारी नाटके सातत्याने करणारे दुबे;खोट्या आणि प्रचारकी हिंदुत्वाच्या विरोधात निवडणूक लढवणारे दुबे; विविध वाहिन्यांसाठी मुलाखती दिल्यानंतर त्यांच्याकडे बेदिक्कत मानधन मागणारे दुबे ; संपूर्ण भारतात आपले शिष्य तयार करणारे दुबे; एकूणच मराठी, हिंदी,इंग्रजी रंगभूमीवरील नाट्यकर्मींसाठी NSD (नॅशनल स्कूल ऑफ दुबे) असणारे दुबे ; आविष्कार, काकडे काका फक्त प्रयोग करत राहातात म्हणून आमच्याशी जोरदार भांडणारे दुबे; तरीही नाटक करायला येणारे दुबे; वाहिन्यांच्या गदारोळात आपल्या हातात असणारी नाटकाची व कवितांची 'चवन्नी'जीवापाड जपणारे दुबे; एकूणच भारतीय रंगभूमीवर एक जिवंत मिथ बनून राहिलेले दुबे........ Recall तर करून झालं पण त्यामुळे confusionच वाढलं. या सगळ्या मुद्यांवर खरंतर खूप लिहिता येईल पण तरीही ते दशांगुळे उरतीलच. एक अत्यंत व्यामिश्र व्यक्तिमत्व पूर्णपणे आवाक्यात येणे कठीणच; त्यामुळे आपल्याला जे वाटतय किंवा जे थोडेफार कळलय तेच आपण बोलूयात हे उत्तम. तर पंडित सत्यदेव दुबे म्हणजे एक बिलासपूरचा हिंदी भाषक – मुंबईच्या आताच्या लोकप्रिय (?) भाषेत बोलायचे म्हणजे 'भय्या'- ज्याचा मराठी भाषेशी काहीही संबंध नव्हता अशा या'भय्या'ने येथील मराठी रंगभूमीला स्थानिक रंगकर्मींपेक्षा अधिक मोलाचे योगदान दिले. तरूणांना घेऊन विविध आशयविषय मांडणारी,विविध फॉर्मची नाटके बसवली. चांगल्या संहिता मिळत नाहीत असं वाटल्यावर तरूण नाटककारांसाठी कार्यशाळा घेतल्या. त्यातून अनेक नाटककार जन्माला घातले. कथा, कविता,लेख यातून नाटक शोधण्याचा व ते सादर करण्याचा सातत्याने प्रयत्न केला. त्यांच्या बाबतीत तर अनेक किस्से-कहाण्या,दंतकथा प्रचलित आहेत. दुबेंना ओळखणारे, त्यांच्याबरोबर काम केलेले दोन-चार लोक जरी एकत्र आले तरी त्यांच्या बोलण्यात असंख्यवेळा दुबेंचा उल्लेख येणे अपरिहार्य असते. हे केवळ नवोदितांच्याच नाही तर रंगभूमीवर कार्यरत असणा-या अनेक बुजुर्गांच्या बाबतीतही घडलेले मी पाहिले आहे. त्यांची सगळी नाटके तुम्हाला आवडतीलच असे नाही, त्यांचे सगळे विचार तुम्हाला पटतीलच असेही नाही परंतु त्यातूनही काही ना काही विचार करायला लावणारे नक्कीच मिळते याबद्दल त्यांच्या विरोधकांचेही एकमत होईल. गेल्या काही वर्षात त्यांनी स्वत:च नाटके लिहिली आणि प्रयोगरूपाने सादर केली. त्यातली बहुतेक नाटके आत्मचरित्रपरच होती. त्या नाटकांतून एकूणच दुबे सर्वार्थाने उलगडत नसले,त्यात'नाटकीय'कल्पनाविलास जरी असला तरी त्यातून दुबे या अनाकलनीय व्यक्तिमत्वाचे थोडेफार धागेदोरे आपल्या हाती लागण्यास मदतच होते. नाटके लिहिण्यापर्वी त्यांनी काही चित्रपटांच्या पटकथाही लिहिलेल्या होत्या परंतु नाटके लिहिणे ही त्यांच्यावर त्यांच्या वयाने सोपवलेली अपरिहार्य जबाबदारी होती असे वाटते. नाहीतर जो माणूस नाटके दिग्दर्शित करीत होता तो नाटके का लिहू लागला असेल ? की आपल्याला जे काही सांगायचे आहे ते इतर कुठे न मिळाल्याने, तसेच सडाफटिंग व्यक्तिगत आयुष्यात भरून राहिलेल्या पोकळीत, मनातील नेणिवांमध्ये दडून राहिलेल्या काही व्यक्ती,काही भास-अभासात्मक जाणिवांनी त्यांना आपले आत्मचरित्रात्मक अनुभव नाट्यरूपात मांडण्यास उद्युक्त केले असेल, की अखंड नाटकातच बुडालेल्या या माणसाला स्वत:शी व इतरांशी संवाद

साधायला नाटक हा फॉर्मच उपयोगी वाटला असेल ? नेमके उत्तर मिळणे अवघड आहे. ते अतिशय उत्तम दिग्दर्शक आहेत. नाटकाच्या प्रयोगातील प्रभावी एन्ट्री-एक्झिट्स, दिग्दर्शकाला आवश्यक असणारी क्राफ्टसमनशीप या गोष्टी तर त्यांच्याकडे आहेतच परंतु त्याहीपेक्षा महत्त्वाची एक गोष्ट त्यांच्याकडे आहे. ती म्हणजे त्यांना संहिता,त्यातील शब्द फार बारकाईने कळतात. शब्दाशब्दांतून व्यक्त होणारे किंवा अव्यक्त राहणारे अर्थ, त्या अर्थांच्या अनेक सूक्ष्म अर्थच्छटा, शब्दांचा पोत त्यांना फार चटकन जाणवतो. नाटकाच्या तालमींच्यावेळी जर ते backstage ला डोळे मिटून पडलेले असले तरीही, एखादा नट जर आपल्या movements चुकला तर लगेच त्यांना ते कळते आणि पुढच्याच क्षणाला त्यांनी त्या नटाच्या नावाने केलेला आरडाओरडा सगळ्या कलाकारांच्या कानावर न चुकता पडतो. आपण बसवत असलेल्या नाटकातील शब्दांना किती movementsची गरज आहे हे त्यांना पक्के ठाऊक असते. अर्थात त्यामागे त्यांच्या अनेकवर्षांच्या अनुभवांचे सार आहे. ‘आयुष्यात पहिल्यांदाच’मध्ये त्यांनी कुसुमाग्रजांच्या कवितांचे ज्या त-हेने अर्थनिर्णयन केले होते तेव्हा कवितांचा असाही विचार करता येतो हे नव्यानेच कळले होते. त्या कार्यक्रमाने आणि त्याआधी घेतलेल्या शिबिरांनी पुण्यात तरूण रंगकर्मींची एक फौजच तयार झाली. पुढे त्यातील अनेकजणांनी समांतर रंगभूमीवर महत्वाची नाटके सादर केली. त्यांनी दिग्दर्शित केलेल्या‘आयुष्यात पहिल्यांदाच’ आणि‘आडा चौताल’या नाटकात काम करायला मिळणे हे माझ्यासाठी फार मोठे workshop होते. चेतनने बसवलेल्या महेश एलकुंचवार यांच्या ‘वाडा’मधले माझे काम त्यांना आवडले होते. ते काम पाहूनच त्यांनी‘आडा चौताल’या त्यांनीच लिहिलेल्या हिंदी नाटकात मला प्रमुख भूमिका दिली होती. त्यावेळी ते किती उलटसुलट पद्धतीने नाटक तपासून बघतात, काही वर्षांपूर्वी स्वत:च लिहिलेल्या शब्दांच्या प्रेमात न पडता, नाटकाची कशी चिरफाड करतात, मनाचे समाधान होईपर्यंत, किती आणि कसे बदल करतात हे फार जवळून पहायला मिळाले. गेल्या काही वर्षात खूपवेळा त्यांच्याशी अनेक विषयांवर मोकळेपणाने बोलायला मिळाले, त्यांना थोडेफार जाणून घेता आले. हे जाणून घेणे माझ्यासाठी फार आनंददायक ठरले आहे. पण तरीही उद्या ते भेटतील तेव्हा, माझ्याशी नेमके कसे वागतील याची खात्री मी आत्ता देऊ शकेनच असे अजिबात नाही. त्यामुळे ते कोण आणि कसे आहेत हे थोडेफार उमगले असले तरी त्याहून न उमगलेलेच अधिक असण्याची दाट शक्यता आहे. म्हणूनच लेखाचे शीर्षक तेच राहिले तरी काहीच बिघडत नाही. (दुबेजींना चतुरंगने जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले तेव्हा चंतुरंगने काढलेल्या डायरीतील लेख)
...............…………….................. गिरीश पतके'

-- मनःपूर्वक दाद द्यावी असा ' आतून ' आलेला लेख !

दुबेजी मला एकदा म्हणाले की, " तुझे ' इराक ' हे नाटक बघायला मी येणार नाही -- " मी कारण विचारले तर म्हणाले की, " इराक चा आणि आपला काय संबंध ? हे तू कशाला लिहिलेस ? " या वेळी दोघांचेही दोन दोन पेग झालेले होते ! त्यांच्या या म्हणण्यावर मी जोरदार चिडलो ! एकमेकांवर ओरडत आमचे भांडण झाले ! भांडणातून वा वादातून कधीही शत्रुत्व निर्माण न करणारा अति-प्रेमळ माणूस ! माझे ' नाणेफेक ' त्यांनी बसवले तेव्हा संहितेतल्या काही भागाबद्दल त्यांनी उपस्थित केलेले एकदोन प्रश्न चेतनने मला कळवले होते. त्यांना काय म्हणायचेय ते माझ्या लक्षात आले आणि पटलेही. मी

तेवढे दोन भाग पुनर्लिखित करून पाठवले. ते पाहून दुबेजी प्रचंड खुश झाले ! " हा मराठीतला एक बहुत इंटेलिजंट नाटककार आहे ! " असे सर्टिफिकेट मला त्या वेळी त्यांच्याकडून मिळाले ! त्या माझ्या पुनर्लेखनाचा नंतर काही ठिकाणी त्यांनी उल्लेखही केला ! माझ्या मनात अर्थातच ते जपलेले आहे ! सावित्रिबाई फुले पुणे विद्यापीठाने एकदा दिग्दर्शकांची भाषणे आणि त्यांच्याशी चर्चा असे एक ' श्रीमंत ' सत्र आयोजित केलेले होते -- त्या वेळी दुबेजींनी चार तास भाषण केले होते ! ते ऐकलेला मी एक भाग्यवान आहे !

गिरीश, तुझ्या या उत्तम लेखामुळे त्या आठवणी जाग्या झाल्या !

Shridhar Chaitanya अराजकीय म्हणजे एखाद्या पवित्र्यातून न येणारे -- असे खूप मौल्यवान साहित्य जगात निर्माण झालेले आहे -- पण, इथल्या सध्याच्या काळाचा प्रभाव असा आहे की असे बोलणेही पाप ठरावे ! असो !

वर्गणिदार मीही होईन. पण, उपक्रमाबद्दल मी साशंक आहे. सामाजिक विषय आणि राजकीय भूमिका म्हणजेच साहित्य, असा समज रूढ होण्याचा हा काळ आहे. त्याव्यतिरिक्त काही आकलन असणे म्हणजे असंवेदनशीलता आणि गुन्हेगारीच ! हे मासिक त्याच मार्गाने जाईल की समावेशक असेल, हा प्रश्न आहे. या विषयावर माझे बरेच लिहून झालेले असल्याने इथे पुन्हा ते म्हणायला मी उत्सुक नव्हतो. पण, थोडक्यात मत मांडले आहे.

माणसाच्या जगण्यात येऊ शकणारी परिपक्वता ती हीच ! त्यासाठीच कला महत्त्वाची !

ते आकलन म्हणजे पुन्हा लेखकाची प्रतिक्रिया नव्हे. कोणतीही प्रतिक्रिया ही अनुभवाचा भागच असेल. वर्डस्वर्थ जेव्हा recollected in tranquility म्हणतो तेव्हा तो कलेला अनुभवाबाहेरची वेगळी उंची देतो.

अनुभव हा प्रतिक्रियारूप असतो -- आशय म्हणजे अनुभवाबाबतचे लेखकाचे भान, समजूत वा आकलन -- त्या आकलनातून आणि ते आकलन नीट व्यक्त होण्यासाठी घाट सिद्ध होतो. घाट हा अनुभवापेक्षा आकलनाशी जास्त संबंधित असतो, असे दिसते.

'...रंगभूमीवर एका संस्थेने एक नव्हे, दोन नव्हे तब्बल चाळीस वर्ष सातत्य राखत 'उत्कृष्टता' टिकवणं.. ते ही एका आडवळणाच्या गावात.. ही साधी गोष्ट नाही ! ...कणकवलीच्या 'वसंतराव आचरेकर सांस्कृतिक प्रतिष्ठान'ने ते करून दाखवलंय. महाराष्ट्रातील प्रायोगिक रंगभूमीच्या संवर्धनात या संस्थेचे फार मोठे योगदान आहे. इथल्या नाट्यचळवळीने आजच्या अनेक दिग्गज लेखक-दिग्दर्शक-अभिनेत्यांना त्यांच्या सुरूवातीच्या काळात संधी दिली.. घडवले.. समृद्ध केले.. इथल्या अत्यंत सर्जनशील उपक्रमांमुळे नसिरूद्दीन शाह, डॉ. श्रीराम लागू, विजय तेंडूलकर, रत्नाकर मतकरी, मोहन

आगाशे,अमोल पालेकर असे अनेक दिग्गज या प्रतिष्ठानशी कायमचे घट्ट जोडले गेले... अशा प्रतिष्ठानच्या, प्रख्यात आणि दर्जेदार 'नाथ पै एकांकिका स्पर्धे'साठी परीक्षक म्हणून निमंत्रित केले जाणे, हा माझ्यासाठी खूप मोठ्ठा सन्मान आहे ! रंगभूमीवर पाऊल ठेवल्यापासून ज्या स्पर्धांविषयी मनात आदरयुक्त भिती आणि आकर्षणही होते त्या स्पर्धेचा मी आज परीक्षक आहे, ही भावना अत्यंत मोठ्या जबाबदारीची जाणीव करुन देणारी आहे.. त्याचबरोबर या क्षेत्रातल्या पुढील संघर्षासाठी बळ देणारीही आहे !! तुका म्हणे धन्य जालों । सप्तसागरांत न्हालों ॥ - किरण माने.'

-- माझी दोन नाटके वेळोवेळी त्यांच्या नाट्यमहोत्सवात झाली होती. त्या निमित्ताने तिकडे दोनदा गेलो होतो. कणकवलीच्या त्या अपवादात्मक जाणकार प्रेक्षकवर्गासमोर आपले नाटक सादर होणे हे खूपच आनंदाचे !

होय, वाचतात काहीजण -- हेच सगळ्यांनी मिळून जगणे --

प्रत्येक माणूस घडण्याची प्रक्रिया असंख्य कारणांनी युक्त असते -- सगळ्यांची एकच इस्त्री करणारी सामाजिक इस्त्री उपलब्ध नाही !

Bajeerao Patil mentioned you in a comment.

Champra Deshpande good morning, I hope lots of people read your thought !

Vivek Jadhav's photo.
अरे, काय, पत्ता काय ? -- शुभेच्छा !

मी ' मॅक्बेथ ' शिकलो ते प्रा होमाई जे श्रॉफ यांच्याकडून ! त्या ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या एम ए होत्या ! इंग्रजी वाङ्मयातल्या सखोल तपस्वी !

Champraतुम्ही दोन्ही नाटकं पाहीली आहेत. त्यामुळे तुमचं अनुमोदन महत्त्वाचं.

तुमच्या अभिप्रायातल्या कंसामुळे, कविता नीट पोचत असल्याचे जाणवून आनंद वाटला !

' अरेरे ' च्या विरुद्ध शब्द ' हरारे ' !

रामचंद्र कदम हा कवी थोर आहे. एका पुस्तकात आमच्या एकत्र कविता होत्या. त्यात त्याच्या मी तीन कविता वाचल्या होत्या. आणि त्या मला खूप ग्रेट वाटल्या होत्या. फेबूवर आल्यावर मी त्याचा शोध घ्यायला सुरूवात केली. आधी प्रयत्न केले होते. पण एवढच कळलं होतं की तो बँकेत आहे. आणि काही लिहित वगैरे नाही. इथं तो सापडला. माझ्या तोंदी त्याचं नाव रामचंद्र वामन कदम असंच होतं.इथ मी एक नाव पाहिलं नुसतं रामचंद्र कदम. मग मी मेसेज मध्ये विचारलं की रामचंद्र वामन कदम तुम्हीच का? तो हो म्हणाला. Champraचा पण तो आवडता कवी असल्यानं त्यांना कळवलं. मग आलाच पठ्ठ्या रिंगणात. ( रवी लाखे ).

पुढे, एकमेकांना जितके अधिकाधिक दुःख देता येईल तितके ते अधिकाधिक आनंदी होतात !

मी ही पोस्ट एक गंमतीची शाब्दिक कोटी म्हणून फक्त दिलेली आहे -- निर्णयाच्या कोणत्याही मूल्यमापनाचा हेतू नाही --

'With Yuval Noah Harari Interesting and engaging morning'
एकोणीसला काय होईल म्हणतोय तो इकडे ?

'तीन दुश्मन!!!'
मागे कवितासंग्रहांनी भरलेली बोगी !

Champra Deshpande commented on Ramchandra Kadam's post.

कष्टांच्या शेकोटीभोवती पिकतात
इतिहासाच्या अफवा आणि
पिढ्यापिढ्यांच्या वाचाळ वदंता

-- हे आहेत आमचे रामचंद्र कदम !

'दो दुश्मन!'
कुणितरी आहे तिथे -- मागे !

आपापले सत्य !

६० टक्के पृथ्वी मृत झालेली आहे : राहुल बनसोडे

youtube.com

Rahul Bansode

साहित्य निर्मिती कोणासाठी ? -- असा प्रश्न आहे --

टाईमपाससाठीच कलेकडे जाणारेच बहुसंख्य असतात, त्यामुळे, तुमचे पहिले वाक्य पटले नाही.

अत्यंत प्रामाणिकपणे स्वतःला पूर्ण खुले करून मांडणारे असे लेख मराठीत दुर्मीळच आहेत !

सुखदुःखविरहमीलन मिळून सगळे सुंदर !

मनामुळेच जगात विद्रोहाची गरज निर्माण होते ! मनाचा विकृत वापर हेच आहे मूळ ! बाकी चळवळी कितीही होऊ द्यात --

साथी न कोई मंजिल - Google Search

google.com

होय -- दुरुस्ती केली.

१०० टक्यांत बसणार का हाच एक प्रश्न दिसतोय -- त्यावरही उपाय आहे -- नोकऱ्या गरजेपेक्षा ३० टक्के जास्त उपलब्ध करून आरक्षण १३० टक्के करावे !

हेच ते ' मानवी जगणे ' !

शेवटच्या दोन ओळींचे बाकीच्या कवितेशी नाते जुळणे अवघड वाटले म्हणून कॉमेंट दिली नाही --

नेमाड्यांनीही चित्र्यांच्या कवितेवर लिहिताना ' भाषेचे सार्वभौमत्व ' वगैरे म्हटले पण आशयाबद्दल काही नाही. गोपूंबद्दल बोलताना " असे वैचारिक संवाद मराठीत प्रथमच आले ", वगैरे -- पुन्हा आशयाबद्दल शून्य !

Pradnya Daya Pawar's photo.
मी सहा महिने होतो या अकोले गावात ! खरोखर सुंदर गाव ! ( रस्त्यावरचे खड्डे वाईटच ! )

अरे, घडलेय खरेच पण बाप्पाला जसा प्रश्न तसे उत्तर दिलेय !

-- अरे वा ! मीही एकटाच ! नो बहीणभाऊ !

आणि याचा अर्थ काय होतो ? -- ' करुणा, ' अत्त दीप भव ' अशा मूल्यात्मकतेचा आणि कलेचा काहीच संबंध नसतो, हे कंठाळीपणे सांगत राहणे !

समाजातले वाईट हे मानवी मनाचेच वाईट असते आणि ते आपल्या सगळ्यांच्या मनांचे असते -- हे न समजता निर्माण होणारी कला खुजीच असणार.

मनाचे अवाजवी महत्त्व ? मग घालतेय कोण सगळा गोंधळ ?

हजारो तोडगे सांगितले लोकांनी -- काय झाले ? माझे मन असे का आहे -- हाच खरा प्रश्न -- मी दुसऱ्याला सुधारायचा तोडगा कुठून आणू -- हा नव्हे --

अरे बाबा, कुणाचेही मन -- व्यक्तिगत तू वा मी नव्हे -- आणि ' चांगले मन ' हे वदतो व्याघात आहे, हे पाहायला हवे --

आधी स्वतःचे मन नीट आहे का, तेही पाहायला हवे -- माझेही मन तसेच असेल तर मी नाही सुधारू शकत काहीच -- मी चांगला आहे आणि दुसऱ्याला सुधारायला जन्माला आलोय अशी भूमिका कुणीच घेऊ नये --

Avinash Gaikwad फॉर्म्यूला विचारते ते मनच ! अंगुलिमालाचे आणि आपले मन वेगवेगळे नसते -- मन ते मन -- दुसरे तेवढे वाईट असे समजून चालायला बरे वाटते, इतकेच ! परिपक्वतेच्या दिशेने जाणे हेच कलेचे काम ! यश कधी मिळेल ही ' मानसिक ' चिंता न करता !

कवीची कीव नका करू -- तो ठणठणीत आहे !

अनेक वाईट गोष्टींचा उगम द्यायचा सोडून आणि एकेक प्रश्न नीट करत बसायचे, असा होणार हा प्रकार -- संसद भवन मूर्त आणि ते चालवणारी मने अमूर्त असे काही नसते --

सेल्फ हीलिंग --

Champra Deshpande चंप्रसर ,संतापाची ही रूपं पहा -

१) भले तरी देऊ गांडीची लंगोटी ,नाठाळाच्या माथी हाणू काठी

२) आंधळ्यासी जन अवघे चि आंधळे
आपणासी डोळे दृष्टी नाही
रोग्या विषतुल्य लागे हे मिष्टान्न
तोंडासी कारण चवी नाही
तुका म्हणे शुद्ध नाही जो आपण
तया त्रिभुवन अवघे खोटे

३) कांद्यासाठी जालें ज्ञान I तेणें जन नाडिले I I
काम क्रोध बुचबुची I भुंके पुची व्यालीची I I
पूजेलागीं द्रव्य मागे I काय सांगे शिष्यातें I I
तुका म्हणे कैंचे ब्रम्ह I अवघा भ्रम विषयांचा I I

४) गाजराची पुंगी तैसे नवे जाले जोगी
काय करोनि पठण केली अहंता जतन
अल्प असे ज्ञान अंगी ताठा अभिमान
तुका म्हणे लंड त्याचे हाणोनि फोडा तोंड

-का व कशासाठी हा संताप ,चीड ,चिडचिड ?

-याला केवळ प्रतिक्रिया म्हणायचे का ?

या प्रतिक्रियांनी कुठली हिंसा आणि संघर्ष सुरु झाला?

व्यवस्था निर्माण करणारी आपली जी मने आहेत त्यांच्याबद्दलचे हे परखड बोलणे आहे. हा तुकारामाचा व्यक्तिगत राग नाहीय, हे समजून घेतले पाहिजे. तुकाराम स्वतः या व्यवस्थेचा भाग नाहीय हे त्याच्या अनेक अभंगांतून दिसते. मन तथाकथित दुष्टासारखेच बाळगायचे आणि त्याला शिव्या द्यायच्या असा हा संताप नाहीय. हा परखडपणा नुसत्या थोड्याफार राजकीय वा इतर बदलासाठी नसून माणूस बदलण्यासाठी आहे. यात तुकारामाचा कोणताही स्वार्थ नाहीय.

काय व्यवस्था म्हणजे ? ती मनांनीच तर तयार होते. ती काही आकाशातून पडणारी वस्तू नाही !

पण, शोषणाचे मूळ तर मनातच सापडणार -- दगडात वा झाडात नाही --

उदा -- सत्तेतूनही शोषण होते --

शोषण हे फक्त पैशाच्या आधारेच नाही होत --

चाकू आणि बंदुकीचे कुठून काढले ? कलेतून व्यक्त होणाऱ्या प्रतिक्रियांचा इतरांवर काही परिणाम होतो की नाही ? तुम्हाला नक्की काय म्हणायचेय ?

मग राहतो कोणता प्रश्न -- माणसांतले संबंध शोषक-शोषित असे का घडतात ?

माणसाच्या प्रत्येक संबंधात संघर्ष आणि आपमतलबीपणाची बीजे असतात. आपण ज्याला प्रेम म्हणतो तेही सशर्त असते. यातूनच उभ्या राहतात शोषण-यंत्रणा. शोषणाची शक्यता बाहेर आपोआप तयार होत नसून ती आपल्या मानसिक अवस्थेतूनच तयार होते. असंख्य मार्गांनी संधी आणि सत्ता मिळवलेले लोक शोषक झालेले दिसतात.

सत्तापालट शक्य असतात -- शोषक-शोषित या भूमिका बदलू शकतात. आणि शोषित पुरुष स्त्रियांचे शोषण का करतात ?

प्रतिक्रियेतून फक्त संघर्ष आणि हिंसा वाढू शकते -- कमी वा नाहीशी नाही होऊ शकत ! रोज हजारो, लाखो गोष्टींना कलेतून प्रतिक्रिया देत राहण्यातून माणसात कोणता बदल होईल ? आणि माणसाला सुमारे पन्नास हजार प्रश्न असून वेगवेगळ्या कौशल्याने त्यांतला एकेक प्रश्न कलेने निराकरण होतो, हे खरे आहे ? मुळात असे प्रतिक्रियेने प्रश्न सुटत नाहीत पण समजा सुटत असले तरी हे समोरचे चार प्रश्न सोडवेपर्यंत आणखी चारशे नवे उभे ठाकलेले असतात -- हा का नाही प्रश्न वाटत आपल्याला ? वर्णन, कारणमीमांसा, विश्लेषण हे सगळे तर जगभर चालूच आहे ना ! आणि एकापेक्षा एक भारी हुशार आणि कौशल्यवान माणसे करताहेत ते काम !

त्या पुस्तकावरही बोलूच पण त्या निमित्ताने, वातावरणात असणाऱ्या या खऱ्या प्रश्नांवरही बोलले जायलाच हवे. आपण बोलायचे टाळले म्हणजे प्रश्न नाहीसे होत नाहीत. प्रत्येक गोष्टीची दूषणे यांना, त्यांना देत राहण्याने असे सिद्ध होते का की ते सर्व दोष आपल्यांत मात्र नाही आहेत ? विषमता, शोषण हे फक्त धर्मवालेच करतात की त्याचे इतरही हजारो प्रकार असतात ? ते का असतात ?

त्या चलाखीवर बोलणे चालू राहीलच पण आपणही विचार करायला नको ? असे काय असते माणसात की ज्यामुळे अशा असंख्य प्रकारच्या चलाख्या निर्माण होतात ? फक्त धर्मवालेच एकमेकांना लुटतात की सगळेच या ना त्या प्रकारे आपली सत्ता निर्माण करून इतरांना लुटू इच्छितात ? इथले धर्मवाले सोडले तर बाकीच्या जगाची काय आहे अवस्था ? आदर्श ? ती तशी का आहे ?

तुम्ही जी सिस्टिम म्हणता ती का, कशामुळे तयार होते ? तिची बीजे सर्वच माणसांत असतात की फक्त निवडक माणसांत ?

'महाराष्ट्र राज्यनाट्यस्पर्धेच्या प्राथमिक फेरीमध्ये, प्रत्यय निर्मित "महादेवभाई" २७ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ७.०० वा.'
शुभेच्छा !

उपस्थित केलेले प्रश्न पाहून त्यांवरही बोलावे म्हणजे चर्चा होईल अन्यथा नुसतेच मते सांगणे होईल --

अत्यंत धीरगंभीर, शांत, प्रगल्भ व्यक्तिमत्व !
गो. म. कुलकर्णी यांच्या घरी दोनदा भेट झाली होती.
" चंद्रकांत, काय लिहितोयस नवीन ? " हे त्यांनी आस्थेने विचारलेले अजून लक्षात आहे !
त्यांच्या स्मृतीस अभिवादन ! ( त्र्यं. वि. सरदेशमुख ).

अरे, इथे ते संपणार नाही -- किती टाईप करत बसणार आपण ? एकमेकांना विचारार्थ मुद्दे देऊन झालेले आहेत, त्यामुळे, इथे थांबू या. समक्ष कधी भेटलो तर सविस्तर बोलता येईल. भेटू-बोलु कधीतरी -- तोवर जय महाराष्ट्र !

मुळात करुणा हे मूल्य आपल्या सध्याच्या नुसत्या प्रतिक्रिया देणाऱ्या मनाच्या आवाक्यातलेच नाहीय. आपण, आहे या मनाने त्यावर मतप्रदर्शन करण्याला फारसा अर्थ नाही. आहे हे मन प्रतिक्रियेचेच गुणगान करत राहणार. त्यामुळे, करुणा या मूल्याचा विषय सोडूनच द्यावा लागेल. मग राहते काय ? नुसत्या प्रतिक्रिया ! त्याचा दुसरा अर्थ असा होतो की व्यवस्था वगैरे काही बदलायची नाहीय -- आमच्या वर्चस्वासाठी प्रयत्न करायचा आहे. शोषक आणि शोषित या भूमिका बदलायच्या आहेत. सर्वजण तेच करत आहेत -- यात कोणत्याही मूल्यात्मकतेचा प्रश्न येत नाही. याचा सारांश असा निघतो की कलेचा आणि मूल्यात्मकतेचा कवडीचा संबंध नाही.

तुम्ही करुणा या मूल्यापासून सुरुवात केली आहेत -- चिडणे, संतापणे या प्रतिक्रिया तर चालुच आहेत -- कलेचे काम त्या मर्यादेत नसते असे तुम्ही म्हणत आहात -- तर अधिक काय असते हे शोधणे महत्त्वाचे आहे -- करुणा या मूल्याला ' ठेविले अनंते -- ' म्हणणे हा त्या मूल्याचा अधिक्षेप होईल, असे मला वाटते.

ठीक आहे -- ' करुणा ' हे अर्थातच एक परिपूर्ण मानवी मूल्य आहे. यापासून सुरुवात करणे खूपच अर्थपूर्ण ठरेल. प्रश्न असा आहे की अमुक पाहून संताप आला, तमुक पाहून आकर्षण वाटले, आणखी एखाद्या कारणाने द्वेष वाटला -- तशीच करुणा हीही एक कशाला तरी येणारी प्रतिक्रिया असते का ? तसे असेल तर ती प्रत्येकाच्या वेगवेगळ्या मानसिक स्थितीवर अवलंबून असते का ? तिचे प्रमाण व्यक्तिगणिक कमीजास्त असते का ? करुणा ही जर अशी व्यक्तिगत प्रतिक्रिया असेल तर इतर कोणत्याही प्रतिक्रियेपेक्षा ती मौल्यवान कशी ? आणि तसे असेल तर ती सशर्त असणार -- अमुक प्रकारच्याच व्यक्तींबाबत फक्त करुणा -- इतर ठिकाणी क्रोध वा द्वेष ! बौद्ध धर्मात करुणा बिनशर्त असते, असे वाचले होते. आणि असे जर असेल तर विद्रोह आणि करुणा एकत्र कसे असू शकतात ? विद्रोह ही एक प्रतिक्रिया आहे की नाही ? -- या मुद्यांवर बोलले जायला हवे.

' एक शून्य बाजीराव ' व्यावसायिकवर येणे शक्य वाटते --

अपवादात्मक माहिती ! इतके प्युअर मला स्वतःलाच नाही चालत !

Girish Patke mentioned you in a comment.

Champra तुम्ही उपस्थित केलेले प्रश्न महत्त्वाचे तर आहेतच शिवाय ते कलावंत म्हणणाऱ्या, म्हणवून घेऊ इच्छिणाऱ्या व्यक्तींच्या चिंतनाचा भाग असायलाच हवेत. तुम्ही या प्रश्नाच्या अनुषंगाने चर्चा व्हावी असे म्हणता परंतु मला असे वाटते की यावर चर्चा होणार नाही. यावर चर्चा करायची म्हणजे स्वतःला नीट ओळखणे,स्वतःचे सामाजिक, वैचारिक, धार्मिक, जातीय आणि वर्चस्ववादी मुखवटे फेकून टाकण्याची, स्वतःला खरवडून बघण्याची गरज असते आणि ते कुणीही करणार नाही. सगळे छान व्हायला हवे, पण ते इतरांनी करावे; शिवाजी जन्माला तर आला पाहीजे पण दुसऱ्याच्या घरात..अशी स्वभावरचना असल्यावर ते कसे साध्य होणणार? काही ठरावीक शब्द, संकल्पना,विचार हे त्या त्या काळात चलनी नाण्यासारखे वापरले जातात. ते वापरले की आवश्यक त्या लौकिक साध्ये प्राप्त होतात. याचा कलेशी काही संबंध नसतो.

एकदोनदा किरकोळ भूमिका केल्या होत्या -- पण, नाटक हेही एक जगणेच तर आहे ! कवीला सगळे जगता येते !

मी अर्थातच वाचेन तो संग्रह -- संवाद होत राहीलच --

Champra Deshpande चम्प्र सर ,तुमच्यासारख्या ज्येष्ठ व मनस्वी कवी-कलावंताने मैत्रीच्या नात्यातून मला जी साद घातलीय त्याबद्दल मी आपले मनापासून आभार मानतो .

आपण विचारलेले प्रश्न महत्वाचे आहेत . त्यातून कलेबद्दलची तुमची नितांत कळकळ दिसून येते .

माझी आपणास नम्र विनंती आहे की ज्या कवितांबद्दल आज लिहून आलेय तो संग्रह आपण वाचून घ्यावा म्हणजे चर्चा अधिक बरी होईल .

तोवर तुमच्या प्रश्नांची उत्तरं इथे दुसरेही गंभीर कवी-कलावंत देतील .

चर्चा होत राहिली पाहिजे . संवाद होत राहिला पाहिजे .

मी आहे त्या मार्गात पण अजून ' पोचलेला ' झालो नाहीय !

विशेष म्हणजे अभिनय क्षेत्रातही असे काही लोक आहेत --

Rajeev Sane mentioned you in a comment.

समग्रताशास्त्र : शास्त्रांची वैशिष्ट्ये व परस्परसंबंध दाखवणारा एकात्मिक नकाशा - अक्षर मैफल

aksharmaifal.com

Santosh Shelar Sharad Deshpande Harish Navale Harishchandra Thorat Rajendra Barve Rajendra Madhukar Manerikar Champra Deshpande Chandrashekhar Sane Chandrahas S Deshpande Indraneel Pole Vidyadhar Madhav Tilak Ajay Brahmnalkar Mukund Taksale Subodh P Jawadekar Dhruv Mankad Manavendra Manvendra Kachole Dnyanada Deshpande

Edit

Bajeerao Patil mentioned you in a comment.

Champra Deshpande आभारी आहे

फिक्शनमध्ये सर्व ललित साहित्य समाविष्ट करावे -- कवितेसह -- असे मला वाटते -- माझ्या आजच्या पोस्टमध्ये मी तो शब्द अशा समावेशक अर्थानेच वापरला आहे.

तुमच्याशी माझे नेहमीच मतभेद असतात --- जाने दो --

Champra Deshpande सुरुवातीला fiction मध्ये कवितेचा समावेश करीत असत, १९ व्या शतकापासून कथाकादंबरी या कथात्म साहित्यासाठी मर्यादित झाला.

माझे वास्तवाचे आकलन ही प्रतिक्रियाच असते --

Sharad Deshpande mentioned you in a comment.

Champra Deshpande fiction is the imagined “other” of reality.

ते सगळ्याला घटना ' समजणे ' म्हणजे मानणे आहे --

प्रायोगिक म्हणजे प्रेक्षकांच्या अपेक्षांचा अनुनय न करणे वा त्यांना बळी न पडणे -- आर्थिक प्रश्नांनी ग्रस्त झाल्याच्या कारणामुळे तडजोडी न करणे --

-- हे थोडक्यात वर दिले आहे.

हो पण त्याबरोबरच जगण्याचे भान देण्यासाठी आवश्यक असलेली आशयसंपन्नताही असणे अत्यावश्यकच.

हे छान केलेत ! कविता तर चांगली आहेच, पण गद्यकाव्य असाही एक प्रकार असतो, हे इथे अनेकांना समजण्याची गरज आहे !

धंदा हा शब्द हवाय कशाला -- तो सोडून चांगल्यावाईटाची चर्चा व्हावी -- हाच तुझ्या म्हणण्याचा सारांश !

कधी कधी मी माझे मत मांडतो, इतकेच -- सगळ्यांनी फक्त धंद्याचेच बोलले पाहिजे, असे मी मानत नाही --

मिलिंदशी संवाद संपला -- त्याने धंदा या शब्दात सगळे सांगून टाकले -- तू काही मूल्यात्मक बोलायचा प्रयत्न करतोयस -- ते बोल --

या चाललेल्या विषयवर तुला काय बोलावेसे वाटते, ते बोल ना -- घाणेकर का ग्रेट आहे, त्यावर बोल --

Makarand Mukund फार ग्रेट असे मराठी चित्रपटात फारसे काही झालेले नाही -- मला आवडलेले दोन – ' चोरीचा मामला ' आणि ' टिंग्या ' --

मी ' कोर्ट ' पाहिला होता -- त्यावर इथे लिहिलेही होते -- माझ्या मते तो ग्रेट सिनेमा नव्हता -- त्याची कारणे दिली होती.

अरे तुझे हे मुद्दे मी आधीच थोडक्यात मांडलेले आहेत -- पुढे, या सिनेमाची गाडी कशी निरुद्देश डेड पडून राहते ते सांगितले आहे ! हेही बोलले जायला हवे असे मला वाटते -- फक्त तिकीटबारीचे आकडे हेच परीक्षण असे ज्यांना वाटते ते त्यात मश्गूल असतातच -- ते तुझ्यासारखी इतकी समर्थने देण्याचा त्रासही घेत नाहीत !

समजून घेण्याचे प्रवाह चालु राहिले पाहिजेत --

मेहनत किती घेतली, पैसा किती खर्च केला असे मुद्दे गैरलागू आहेत.

अभिरुचीबाबतच्या प्रश्नांचीही घुसळण होत राहावी असे वाटत असल्याने मी अजूनही कधी कधी लिहितो --- विशेषतः ' हेच ते ग्रेट ' असे वाटण्याची शक्यता दिसते तिथे.

माझे म्हणाल तर मी फार्सेस, वगनाट्ये वगैरे अनेक प्रकारांचा मनमुराद आनंद घेणारा आहे पण याचा अर्थ अमुक एक ग्रेट नाहीय हे म्हणायचे स्वातंत्र्य मी टाकत नाही. सर्व ठिकाणी सगळ्यांनी टाळ्या वाजवत राहिले पाहिजे असे मी मानत नाही.

म्हणजे एखादा सिनेमा तिकीटबारीवर यशस्वी झाला की नाही, एवढेच पाहायचे आणि बाकी काही विचारच करायचा नाही ?

एवढे का डिस्टर्ब होताहेत हा सिनेमा आवडलेले लोक ? कलेबाबत फक्त करमणुकीच्या स्तराचाच सगळ्यांनी विचार करून समाधानी राहावे हा आग्रह कशाला ? मेहनत खूप लागते, सोपे नसते, पैसा कुठून आणायचा -- या मुद्यांवर मूल्यमापन संपवायचे ? तो बायोपिक आहे की फिक्शन आहे हा नसतो प्रश्न -- जगण्याच्या प्रश्नांबाबत तो उथळ का राहिला आहे याची चर्चा होणे मला योग्य वाटते. ज्यांना हे नकोच असेल त्यांनी जरूर आपापल्या समाधानात राहावे. यातले मुद्दे पटणारे, महत्त्वाचे वाटणारे असेही काही याच इथल्या चर्चेतही आहेत याची दखल घ्यावी. प्रतिवादाचे स्वातंत्र्य असतेच पण असे काही बोललेच जाता कामा नये अशी अपेक्षा योग्य नाही.

ते गुणही लिहिले आहेत, पण, हे ग्रेट का नाही तेही बोलायला हवेच --

असहमत असणे, असे तर होऊ शकतेच --

अरे, तसे काही नाही -- इथे किती टाईप करत बसणार, म्हणून म्हटले -- कधी भेटलो तर बोलु सविस्तर --

आपल्यांत मतभेद आहेत -- जाने दो --

तरीही जगात ग्रेट सिनेमे निघत असतात -- गरीब देशांतूनही निघतात -- ही समर्थने फक्त मराठीवाल्यांनाच का लागतात ?

कविता वाचकाला खुलेपणासाठी प्रवृत्त वा उद्युक्त करू शकते -- हे तिचे अस्तित्वसमर्थन म्हणता येईल !

आपले पूर्वग्रह, आपल्या अपेक्षा, आपली मते बाजूला ठेवता येणे म्हणजे खुलेपणा.

खुलेपणा नसेल तर कविता समजत नाही आणि खुलेपणा असेल तर, तीच तर कविता -- असा हा मजेदार तर्क आहे ! ( मी कविता लिहीतच राहणार आहे ! )

कविता उलगडण्याचा मार्ग वर सांगितलेला आहे.

फिक्शन हा शब्द मराठी म्हणूनच वापरायचा --

माझ्या मते असे शब्द सरळ आपल्या भाषेत रिचवून घ्यावेत -- वाटल्यास त्यातल्या सर्व अर्थच्छटांचा वेध घेत --

शक्य तेवढे केलेय, बाकी पराभव मान्य ! कदाचित हे पूर्णच निरर्थकही असू शकते !

वास्तवातली समस्या ही प्रतिक्रियात्मक निराकरणासाठी असते तर फिक्शनमधली समस्या ही प्रतिक्रियाशून्य भान घेण्यासाठी असते --

कल्पित कथा मध्ये तो सगळा अर्थ नाही येत --

ओरिजिनल देणे कायदेशीर असते का ते माहीत नाही -- आहे यावर भागवून घेणे !

म्हणजे, कोणत्याही सवयीतून लिहिणे वाईट, असे म्हणताय का ?

चांगली हिंदुत्ववादी कविता ? इथे देता येईल का ?

१०० टक्के सदसद् वगैरे काही नसते -- इकडे सज्जन असणारा तिकडे करप्ट असतो -- वर्चस्ववादी असतो -- कुणालातरी देशोधडीला लावणारा असतो --

ऐकले ! अत्यंत महत्त्वाचा विषय ! राजकारण्यांचा हा हिंसक धंदा आपणही अनुभवत असतोच !

Prachi Dublay's photo.
या विषयावर प्राचीला ऐकणे म्हणजे सदभाग्य अनुभवणे !

मास्तर म्हणवून घेणे हे अपमानास्पद असलेला हा समाज !

मला चांगले वाटलेले इथे फ्रेंडससाठी देत असतो --

नवीन लोकांना उपयोगी मुद्दे -- आवडताहेत अनेकांना असे दिसतेय !

नवरा ः आपल्या लग्नात बघ, तुझ्या माहेरच्यांनी तवा दिला होता बघ आपल्याला --
बायको ः तवा नाही, चांगली कढई दिली होती !
नवरा ः अगं, तवा म्हणजे उथळ कढईच की !

-- यातले तवा म्हणजे उथळ कढईच की -- हे शरदरावांच्या तोंडून ऐकलेले डोक्यात फिट बसलेले आहे !

त्याचा अर्थ असा की द्वेषयुक्त असूनही स्वतःला पुरोगामी म्हणवून घेतले जाते -- तुम्हाला हे समजत नसेल यावर माझा विश्वास नाही -- तरीही, स्पष्टीकरणासाठी सान्यांचा लेख वाचा --

म्हणूनच तुम्हाला सान्यांचा लेख वाचायला सांगितले -- वैभव म्हणतायत दुलक्ष करा -- सान्यांचा लेख दुर्लक्षिता येतो का बघा --

- हे जर असं आहे तर मग 'पुरोगामी द्वेष ' हे नेमकं काय आहे Champraसर ?

असा कोणी आज सापडला तर सांगा ......देवीचा रोगी दाखवा...........

Milind Shintre mentioned you in a comment.

Champra Deshpande.... मोदीद्वेष्टे स्वतःला पुरोगामी समजतात. काही ज्ञानेश्वर द्वेष्टेही स्वतःला पुरोगामी समजतात.

खरा पुरोगामी हा समतावादी तर असलाच पाहिजे पण, धर्म-जात-भाषा अशा स्तरावर द्वेषशून्य असला पाहिजे ! - ही घ्या थोडक्यात व्याख्या.

आजच्या म्हणजे ३१-१०-१८ च्या लोकसत्तातला, राजीव साने Rajeev Sane यांचा ' आर्थिक डावे ते निम्नगटीय-प्रतिगामी ' हा लेख वाचा म्हणजे काही मुद्दे तुमच्या लक्षात येऊ शकतील. तुम्ही दुर्लक्ष करू इच्छिता अशा मुद्यांवर कुणी ब्र ही काढता कामा नये -- असले अभिव्यक्तिस्वातंत्र्य नका राबवू --

कोणतीच मानवनिर्मित गोष्ट निर्दोष वा परिपूर्ण नसते, मग तो धर्मवाद असो की पुरोगामीपणा. त्यांच्या दोषांची व अपूर्णतेची चर्चा बिनधास्त व्हावी ! मला आवडला हा लेख !

द्वेषयुक्त असून स्वतःला पुरोगामी म्हणवणारे कुणी नजरेला पडतात का, ते बघा -- तसे कुणी नसतील तर पोस्ट कॅन्सल !

Champra सर,पुरोगाम्यांना धारेवर धरण्याची (बदनाम करण्याची' असं म्हणायचं टाळतो ) तुमची मोहीम चांगलीय . पण पुरोगामी म्हणजे कोण ? तुमच्या मतानुसार 'पुरोगामी'ची व्याख्या काय आहे ?त्यांची ठळक वैशिष्टये काय आहेत ?

त्या अमुकच प्रकारच्या का नाहीयत, असे काही ते विचारत असतात.

अँटि पोएट्री लिहिणाऱ्याकडून रोमँटिक कवितेची अपेक्षा ?

मीही त्यांच्या प्रतिक्रिया प्रमाणिकपणे वाचूनच लिहिले आहे.

'साहित्य संमेलनाध्यक्ष अरुणा ढेरे'

फारच छान !

संतोष पद्माकर टीका सहन करण्याच्या बाबतीत टची असणारे त्यात काहीच नाहीय -- आम्ही हवे ते बोलु -- त्यावर कवीने काहीच बोलु नये, असा बंदोबस्तही नको --

वाचलीय हो, आणि बाकीच्यांच्या प्रतिक्रियाही

प्रश्न तो नाही -- नकार येणे वा नावड व्यक्त होणे हे आम्हाला नवे नाही वा त्याबाबत टची असण्याचा प्रश्न नाही पण निरुपयोगी कॉमेंट वारंवार येत राहिल्या तर कधीतरी त्यावर बोलावे लागते --

पोस्ट पुन्हा एकदा वाचून पाहावी --

एक म्हणजे, लाखे किंवा मी, तुमची कविता लिहिणार नाही. आपापल्या आकलनाचीच कविता लिहिणार. स्वतःच्या सवयीतली आणि आवडीचीच कविता सर्व कवींनी लिहावी अशी अपेक्षा वाचकांनी ठेवू नये आणि ठेवली तरी आत्मनिष्ठेचे कवी तिची फिकीर करणार नाहीत. जगात हजारो प्रकारची चांगली कविता लिहिली जाते -- अगदी न-कविता ( anti-poetry ) पर्यंत ! विभ्रमवाली कविता हा एकच प्रकार नसतो. कोणताही कवी प्रदीर्घ काळ लक्षात राहावी या हेतूने कविता लिहीत नाही -- तो त्याची आकलन-प्रक्रिया व्यक्त करत असतो. एखाद्या वाचकाच्या आवडी फार मर्यादित असतील तर त्याला कवी काय करणार ? वाचकाने खुले नसणे हा कवी-वाचक यांच्या नात्यातला एक मोठा अडथळा आहे. तो तसाच ठेवून तुम्ही कवींना दूषणे देत बसता. काहीजण या कविता आत्मीयतेने वाचतात, वाखाणतातही. तुम्ही तेच तेच ' दोष ' सारखे इथे मांडत बसून इतरांच्या स्मूथ प्रक्रियेतही अडथळा आणत बसण्यातून काय साध्य होणार ? ' बीज भाजून केली लाही ' हा तुकारामाचा अभंग कोणते विभ्रम व्यक्त करतो ? तुम्हाला फक्त मूडवाली कविता आवडत असावी, असे दिसते. तुमच्या दृष्टीने इतर सर्व कविता बाद असल्या तरी ते ते कवी तुमचे मत फारसे मनावर घेणार नाहीत. फर्नांडो पेसोआ सारख्या जागतिक महत्त्वाच्या आणि ' अमर ' ही असणाऱ्या कवीच्या कविता वाचायचा प्रयत्न करून पाहा. तुमच्या आवडीनिवडींत घट्ट रुतून बसणे हेच तुमचे ठाम असेल तर आमच्या कविता न वाचणे, हाच त्यावर उपाय आहे. धन्यवाद !

डॉ. भुथडियांच्या असण्यातच एक चिंतनशीलता आहे, त्यामुळे, ही भूमिका ते खूप उंचीवर घेऊन जातात --

' प्रत्यय ' चा एक मास्टरपीस !

Champra Deshpande commented on Ravindra Damodar Lakhe's post.

असंख्य प्रकारांच्या अनुभवांची निर्मिती करून तुम्ही मानवी मनाचा पूर्ण अस्तित्वासह वेध घेता, हे तुमचे, कवी म्हणून प्रमुख वैशिष्ट्य आहे ! एखाद्या मतप्रदर्शनाच्या वा प्रतिक्रियेच्या संकुचित स्तरावर ही कविता थांबत नाही ! या गुणाचे भान घेत या कविता वाचल्या जायला हव्यात, असे वाटते --

Edit

Champra Deshpande commented on Pradnya Daya Pawar's photo.

'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ख्यातनाम कवयित्री- लेखिका विराजमान होते आहे, याचा साहजिकच आनंद ! योगायोगाने ती माझी ज्येष्ठ मैत्रिण आहे, ही आनंद दुणावणारी बाब. मनःपूर्वक अभिनंदन, अरुणा ! तुझ्या अध्यक्षीय भाषणाची उत्सुकता राहील.'

मनःपूर्वक अभिनंदन !

मूळ पोस्टवर फारसे बोलले न जाणे आणि मला दोनचार टप्पू खावे लागणे -- हे सारांशरूपाने या चर्चेचे फलित म्हणता येईल. थोडा का असे ना खुलेपणा असलेले लोक यावरूनही काही समजून घेऊ शकतील ! असो -- धन्यव्वाद !

Chitra Rajendra Joshi's photo.

वा ! तुमच्यामुळे आम्हालाही या चित्रांचे दर्शन झाले !

कुणाला खेळवणे वा दुखवणे वा काही खतरनाक डावपेच असले काही मी करत नसतो. एखाद्या विषयाच्या सर्व बाजू वा कंगोरे समोर यावेत -- मग ज्याचे त्याने समजून घ्यावे, हा हेतू असतो. याला पूरक मीही मधे मधे बोलत वा उत्तरे देत असतो. मला तर ठाम मते बाळगणाऱ्यांच्यांत अत्यंत खतरनाक -- हिंसक शक्यता दिसतात !

मते ही उपरी असतात -- त्यांना सत्यतेचे वा श्रेयाचे मूल्य नसते असे आकलन असलेला माझ्यासारखा मते ठाम नाही वागवू शकत !

कुरुसोवा चा ' राशोमान ' हा चित्रपट आठवा --

अमान्य ! प्रत्येक अभ्यासू माणूस त्याच्या प्रभावग्रस्ततेतूनच बोलतो -- तुम्हाला काय जवळचे वाटते तिकडे तुम्ही जाता --

कलकलाटप्रवणता उघडी पडावी म्हणून मी होमियोपाथीप्रमाणे कलकलाटप्रवण पोस्ट देत असतो.

आणि तरीही सर्वांशी सर्व विषयांवर चर्चा करायची तुम्हाला मुभा आहे कारण इथे लोकशाही आहे.

शास्त्र, तंत्रज्ञान या उपऱ्या नसलेल्या गोष्टी. कल, मते, स्वभाव, मूड, आवडीनिवडी -- या सर्व उपऱ्या गोष्टी. ज्यांनी मनाचे कंडिशनिंग होते ते उपरे. त्याच्याशी समरूप झाल्याने माणूस हिंसक होतो. हिंदुत्ववादी आणि कम्युनिस्ट, नास्तिक वा आस्तिक -- सगळेच हिंसक होतात ते त्यांच्या घट्ट प्रोग्रामिंगमुळे. मानवी संबंधांत ते घातक असते. राजकारण हा मानवी संबंधांचाच खेळ आहे. त्यामुळे त्यातले हे उपऱ्या गोष्टींशी समरूप झालेले लोक जगाची वाट लावत राहतात. युवाल हरारी नावाचा एक विचारवंत, हे पाहूनच, यापुढे कवी महत्त्वाचे ठरतील असे म्हणतो.

दुसरे एक सांगतो. जसे संगणक वा बँक अकौंट हॅक होतात तसेच डायरेक्ट माणसेच हॅक करायचे संशोधन चालु आहे. त्याला ही सगळी मतवाली आणि कलवाली माणसे ताबडतोब बळी पडतील !

घट्ट मतांच्या चर्चा अशाच होणार ! घट्ट मते असूनही दिलखुलास, मैत्रीपूर्ण चर्चा, असे इथे एफबीवर तरी फारच कमी दिसते ! माझ्या मते मुळात ' मते ' ही जगण्यातली एक उपरी बाब आहे !

Varshha Mahajan mentioned you in a comment.

Champra Deshpande तुमची आशयघन कमेंट खूप बुस्टिंग असते.
परत वाचून समजवून घेतलीये.
पुढच्या कवितेच्या वेळी उपयोगी पडेल.

असते ना -- मतदान करतोच ना मी -- पण चर्चा या हेकटपणे होऊ नयेत असा माझा प्रयत्न असतो -- अमुक पटवण्यापेक्षा विषयाचे सर्व कंगोरे समोर यावेत आणि ते पाहून ज्याचे त्याने ठरवावे -- ही माझी पद्धत आहे --

नाही -- सर्वांनी सर्वांचे पाहायचे -- निश्चित मते घेऊन न फिरणारा काही लपवत नसतो -- माझीच लाल म्हणणाऱ्यांचीही सर्वांनी तपासावी -- असा खुलेपणा --

अजूनही तुम्ही लपवणेच म्हणताय -- मी म्हणतोय -- आकलनाची लवचिक -- ओपन प्रक्रिया.

ठाम मते न बाळगता एकूण परिस्थितीचे भान वाढवत बदलायला वा नवे स्वीकारायला तयार असणे म्हणजे आकलनाची लवचिक प्रक्रिया. तुम्ही हीच बाळगा असे मी कुणाला सांगायला जात नाही पण मीही कशी चर्चा केली पाहिजे ते इतर कुणी सांगितलेले मलाही नाही चालत !

इथे लवचिक मतांच्या लोकांना कल लपवणारे म्हटले गेल्याने तशाच जरा कडक भाषेत पक्की मतेवाल्यांना मी रोबो म्हटले आहे. शिवाय, मानवी संबंधांच्या क्षेत्रात पक्की मते म्हणजे रोबोटिक आत्मनाशच, असेच मला दिसते.

आणि लवचिक आकलनाच्या लोकांना कल लपवणारे असे म्हटल्याने चर्चा नाही खुंटत ?

सहमत . मी काही वेगळा नाही . पण माझा कल उघड न करणे मला रास्त वाटत नाही आणि त्यामुळेच जमतही नसावे !

सर्वच मते संकुचित असतात -- या अंगाने माझे लेखन आहे -- भाषा, विचार यांसहच जगणे चालु असते -- तर या गोंधळात माझ्यासारखी माणसेही असणारच --

हाच प्रश्न इथे वेगळ्या प्रकारे विचारला आहे, इतकेच --

एक मत बनवून आयुष्यभर ते बाळगत बसणे म्हणजे बिगर-कलकलाटी म्हणायचेय का ? hesitant approach -- वेळोवेळी नव्याने काही समजून घ्यायला, मते बदलायला तयार असणे म्हणजे कलकलाटीपणा असे मानणे हे निश्चितच लोकशाहीच्या मुळावर येणारे आहे !

पाचोरा तालुका -- हल्ली जामनेर तालुका असावा --

Champra Deshpande commented on Varshha Mahajan's post.

आधीच्या सर्व ओळींचा अर्थ साठत साठत शेवटच्या पिळदार ओळीवर येऊन पडणे आणि पूर्ण होणे ही या कवितेचा आशय रिच करणारी धक्का तंत्राची बाब छान आहे !

आता नाही आठवत -- ३४ वर्षे होऊन गेली --

माझा मित्र आहे लोहाऱ्याचा प्रमोद वामन पवार , किराणा मालाचं दुकान आहे त्यांच . तुम्ही ओळखता का ?

तालुका पाचोरा

लोहारा.

हे ठीक आहे पण निवडणुकीचा काळ आहे -- लष्करच्या भाकरी नकोत !

हे खूप पसरट झाले -- कशाचे उत्तर आहे हे ?

सामान्य माणूस असा वेगळा नसतोच. असतात ते तुम्ही आम्ही. त्यामुळे सामान्य लोकांच्या मनात म्हणून जे असते ते सामान्य माणसाचे नाव पुढे करणाऱ्यांच्याच मनातले असते की काय अशी शंका येते.

कोण जाणे ! खात्री नाही देता येत ! तुमचा यावर अभ्यास असेल तर सांगा -- सामान्य लोक म्हणजे जातवादी लोक असा अर्थ न करता बोला --

तुम्ही म्हणता तसे घडत असेल तर ती जातवादी पक्षांना येणारी प्रतिक्रियाच असणार -- कारण, जातवादी लोकांना ब्राम्हणद्वेष्टे असणे भाग असते !

उन्मादी लोक सगळीकडे आहेत -- त्यांचे समर्थन तुम्ही-मी कधीच करणार नाही !

लोकशाही याचा अर्थच मतदारांच्या शहाणपणावर विश्वास !

या गाण्याप्रमाणे चालत असेल तर बरेच लोक स्वतःला वेडा म्हणवून घ्यायला तयार होतील !

ही अशी ' जाणकार ' निरीक्षणे/विश्लेषणे तुम्हाला वाचायला आवडतील का, ते सांगा -- २०१९ च्या निवडणुका पार पडेपर्यंत मधून मधून देत जाईन --

Champra Deshpande commented on Prachi Dublay's photo.

'" Everything we do is Music! " - John Cage'
आमच्या काळातल्या सगळ्या कृष्णधवल नायिका आठवल्या !

क्षमा कशाला ? एकदा कविता लोकांसमोर आली की फालतू-फडतूस म्हणायचेही स्वातंत्र्य असतेच लोकांना !

यातले काही शब्द माहीत नाहीत -- पण अभावग्रस्ततेचे एक वास्तव चित्रण आहे ! चांगली आहे कविता --

तसेच अश्विन नव्हे तर आश्विन --- आ !

Subhash Khalde's photo.
आम्हा निवृत्तांचे प्रिय नेते ! सुप्रभात !

आणखी ४-५ झाल्यावर थांबेन -- मग दुसरे काही --

आपण लिहिलेले वाचले जाणे हे अनेक बाबींवर अवलंबून असावे. ज्यांना आपल्या कविता वाचाव्याशा वाटतील ते वॉलवर जाऊनही वाचतील. वेळ असेल तेव्हा समोर आली कविता तर पाहू, असेही काही असणार. ते हिशोब आपण जुळवत बसायचे कारण नाही. कविता लिहून झाली की इदं न मम म्हणावे ! मी असे करतो --

ही मालिका संपल्यावर केली असती पण आशय या मालिकेत संपून जाईल -- तरीही सूचना विचाराधीन --

या तिन्ही अनुभवातून आलेल्या बौद्धिक प्रतिक्रिया आहेत -- स्वधर्म हाही प्रतिक्रियारूपच असणार असेल तर त्याला एवढे कसले महत्त्व असू शकेल ?

मला बी जत्रंला येऊं द्या की रं --

हे खूपच गंभीर प्रश्न आहेत !

'काल पुस्तक पेठेत काढला गेलेला फोटो.'
उत्तम --

'दि. १८-१०-१८ ला पुस्तक पेठेत काढला गेलेला फोटो.'
आता ठीक आहे --

तुम्ही ही एक पोस्ट करा -- हे फार महत्त्वाचे आहे --

बाप रे ! धन्यवाद, संदीप ! केवळ अर्ध्या तसात मेंदूची पावडर करून देणारे हे एक जबरदस्त भाषण आहे !
राजकारण्यांपेक्षा कवी महत्त्वाचे ठरण्याची शक्यता तर डोळे उघडणारी आहे ! ( युवाल हरारे ).

Hari Narke mentioned you in a comment.

'दसरा - पुस्तक पेठेच्या विस्तारित जागेचे उद्घाटन आणि साहित्यिक गप्पा- विश्वस्त व लॉक ग्रिफिन या रहस्यमय कादंबऱ्यांचे लेखक श्री वसंत वसंत लिमये, श्री संजय भास्कर जोशी, श्री माधव व सौ. अंजली वैशंपायन, ख्यातनाम

नाटककार श्री चंप्र.देशपांडे, मनोविकास प्रकाशनाचे श्री अरविंद पाटकर, श्री सदा डुंबरे, माजी कुलगुरू श्री योगेंद्र नेरकर, श्री अरूण कुलकर्णी, सन्मित्र अनंत अच्युत व उपस्थित अन्य मान्यवर'

Champra Deshpande commented on Hari Narke's post.

धन्यवाद, नरके सर !

ही एक ग्रेट लघुकथा आहे !

शहाणपण जन्मतः असते का, हा विषयच नाहीय -- कधीही, ते असते किंवा नसते !

हे तर वडाचा दोर पिंपळाला लावणे झाले ! पण, हे नकळत घडले तरीही पिंपळ खुश होऊ शकतो ! ती प्रार्थना ऐकून घेण्यात त्याला काहीही प्रॉब्लेम येणार नाही !

त्यांच्या बायका कसल्या खतरनाक असतील, ते लक्षात घ्या ! असे केले तर घरात राहता येईल ?

तुम्ही वर जी शहाण्या लोकांची नावे दिली आहेत त्यांच्यानंतर माणसाचे खूप ज्ञान व अनुभव वाढलेले आहेत -- म्हणजे आता आज ते लोक बिनशहाणपणाचे ठरणार का ? शहाणपण जर प्रगतीवर अवलंबून असेल तर ते कधीच अस्तित्वात नसते, असे म्हणावे लागेल ! प्रगती कधीच ' पूर्ण ' नसते !

थोडे असणे म्हणजे प्रगतीवाले --

इथे त्याच हेतूने चर्चा चालु अहे -- त्या निमित्ताने वेगवेगळे मुद्दे समोर येतात -- शेवटी ज्यालात्याला स्वतःला समजावे लागते -- जगात काय चाललेय आणि बुद्धाला काय सापडले याचा तसा उपयोग नसतो -- खुदकोही समझना चाहिये --

मानवी संबंधांत बुद्धीने चालणे म्हणजे विभक्त मनाने चालणे -- बुद्धीने एकसंध करुणा शक्य नाही, असे माझे आकलन आहे -- तुम्ही म्हणता तसे काही माणसाला ' नवे ' समजत असावे, अशी चिन्हे दिसत नाहीत -- तुम्हाला romanticism आवडत असेल तर चालु द्या --

आपण या प्रश्नाच्या अनेक बाजू पाहतोय -- उत्तराचा शोध लागेल का, ते माहीत नाही --

दुर्दैवाने, ' समतोल व्यवस्था ' कुठे असल्याचे अजून ऐकिवात नाही --

प्रतिक्रिया द्वेषाचीही असू शकते --

त्या पात्राने त्या प्रश्नाकडे कसे पाहावे वा हाताळावे यावर सध्या बोलु या -- त्याची समस्या खरी आहे --

प्रत्येक पात्र लेखक कसे जगणार ?

मनात संताप ठेवून प्रेमाने तरी कसे जगणार ?

होय, बुद्धिप्रामाण्यवाद्याला प्रतिक्रियावादी असणे भाग असते !

कलेच्या, साहित्याच्या क्षेत्रात हेकटपणा महत्त्वाचा ठरू शकत नाही! -Maharashtra Times
maharashtratimes.indiatimes.com
तुम्ही नीट वाचत नाही, हा तुमचा मोठा प्रॉब्लेम आहे -- जाने दो --

" भ्रष्टाचार वाईट ना ? "
" हो हो, वाईटच ! "
" पूर्वग्रह वाईट ना ? "
" हो हो, वाईटच ! "
-- असे आहे हे ! सर्वमान्य !

' अक्षरवाङ्मय ' च्या सिनेमाविषयक अंकातल्या लेखात, कर्नाटकातले दिग्दर्शक गिरीश कासारवल्ली यांनी एक प्रश्न उपस्थित केलेला आहे. नुसती वेगवान कथा सांगण्यातून, सर्जकतेला आवश्यक असणारी सूक्ष्मता आणि सखोलता मारली नाही का जाणार -- हा तो प्रश्न.

अध्यात्म ही इतर भावनांपैकीच एक भावना असेल आणि नियंत्रण करणारा सुकाणू असेल तर त्यात वेगळे काय आहे ? हे तर सर्वांचेच रूटीन आहे !

Champra Deshpande commented on Amol Deshmukh's photo.

'महाराष्ट्राचे लाडके लेखक,अभिनेते आणि आमच्या महाराष्ट्र स्कूल ऑफ ड्रामाचे कार्यकारी सदस्य श्री #Abhirambhadkamkar यांना भारत सरकारच्या संगीत नाटक अकादमी चा मानाचा पुरस्कार जाहीर। अभिनंदन अभिरामजी '

अभिनंदन !

अहो, प्रेक्षक तिकीट खिडकीवर विचारतात -- कोण काम करतेय -- प्रशांत दामले, भरत जाधव, असे कुणी नाही ? -- चालले परत ! पैसे वाया का घालवायचे ?

नाटकाचा आशय आणि तंत्र

कलेत आपण नृत्य, शिल्प, चित्रकला, साहित्य असे विभाग पाहतो. लिखित संहितांत म्हणजे साहित्यात आपण कादंबरी, कथा, कविता, नाटक असे प्रकार पाहतो. त्यातही साहित्यात पौराणिक, ऐतिहासिक, सामाजिक वा राजकीय असे विभाग पाहतो. इथे मला आणखी एक विभागणी सुचवायची आहे. ही विभागणी कडेकोट कप्प्यांसारखी बंदिस्त नसेलही, पण, ती अस्तित्वात असते. ही विभागणी आशयाच्या बाबतीत असते. आपण इथे नाटकाबद्दल बोलणार आहोत म्हणून त्या अंगाने बोलु. (१) ' डोक्याला ताप नको ' टाईप – प्रेक्षकांच्या मानसिक सवयींना विचलित न करणारा आशय – याला ' सपाट ' आशय म्हणू. (२) प्रेक्षकांच्या मानसिक सवयी विचलित करणारा आशय – याला ' सर्जक ' आशय म्हणू.

सामन्यतः व्यावसायिक वा आर्थिक नफ्याची अपेक्षा करणारे नाटक हे सपाट आशयाचे असावे लागते. तसे ते नसेल तर ते सपाट आशयाचे करून घ्यावे लागते. याउलट सर्जक नाटक हे आर्थिक फायद्यासाठी केले जात नाही. किंबहुना तोटा झाला तरी चालेल, असा हा प्रकार असतो. इथे एक मुद्दा लक्षात घ्यायला हवा की नाटक ही एकमेव अशी सादरीकरण कला आहे की जी कमीत कमी खर्चात प्रेक्षकांसमोर आणता येते. ' एक नट आणि एक प्रेक्षक असला की नाटक सादर होऊ शकते ', ' नाटकाचा सिनेमा होऊ नये ', ' नाटकाच्या नेपथ्याला टाळी पडली तर नाटक फसले, असे समजा ' – अशा प्रकारची वाक्ये सर्जक नाट्य विभागात बोलली जातात. याउलट व्यावसायिक नाटक गर्दीसाठीच असणारे, गर्दीला खुश करणे हाच हेतू असलेले आणि करमणूकप्रधान असावे लागते.

सपाट आशयाच्या नाटकात सादरीकरणातली जादूच महत्त्वाची असते. अभिनयसाठी स्टार्स असणे, नेपथ्यात विमानतळ वा स्वयंपाकघरातल्या सिंकच्या नळाला पाणी येणे, प्रकाशयोजनेच्या करामती, भरपूर पात्रे, वेषभूषा, प्रभावी संगीत – हे असे सर्व लागते. यसाठी गुंतवणूकही बरीच लागते. नफा मिळवणे हाच हेतू असल्याने, इथे ती गणिते खेळलीही जातात. हे सर्व सर्जक आशयाच्या नाटकात जमणे फारच अवघड असते. इथे एक तर अपेक्षित प्रेक्षकसंख्या कमी असते. मराठीत तर '

डोक्याला ताप नको ‘ हे एकूणच प्रेक्षकांचे आद्यतत्त्व असते. इथे नफा तर जाऊच द्या तोटा होण्याचीच तयारी ठेवावी लागते. सर्जक नाटकांसाठी ही एक मर्यादा असते, असेही म्हणता येत नाही. उलट तंत्राचा बडेजाव सर्जक नाटकाला मारकच ठरण्याची शक्यता जास्त असते. त्यामुळे, इथे सूचकतेचे आणि अर्थपूर्ण कल्पकतेचे महत्त्व वाढते. ‘ एक शून्य बाजीराव ‘ या नाटकात फिरता रंगमंच घेऊन नाटकातल्या नाटकाचे थियेटर दाखवण्यापेक्षा कल्पक नेपथ्याने अपेक्षित परिणाम साधले जातात. रवी लाख्यांनी माझे ‘ समतोल ‘ हे नाटक बसवले तेव्हा, मध्यमवर्गीय घराचे पूर्ण नेपथ्य न मांडता एका छोट्या पडद्यावर पंखा, फ्रिज, कपाट, टेबल-खुर्ची अशी चित्रे काढून घेतली होती ! तो पडदा हेच नेपथ्य होते ! अशी अनेक उदाहरणे सांगता येतील.

उत्तम, सखोल अभिव्यक्तीच्या गाण्यात तबलजीने वा इतर वादकांनी जास्त करामती करायच्या नसतात. पूरक म्हणून त्यांचे काम महत्वासाचे असले तरीही. काल फेसबुकवर ‘ नाटकातली भव्यता ‘ या विषयावर आपण एक चर्चा करत होतो. त्या संदर्भात, त्याबाबतचे माझे हे आकलन इथे थोडक्यात मांडले आहे.

( व्यावसायिक नाटकालाही अचानक कोटीकोटीची गुंतवणूक शक्य आहे का ? ‘ तुझा धंदा किती, तू बोलतोस किती ‘ असेच ते होणार ! आजाराने जर्जर झालेल्या माणसाला सांगावे की ‘ तू रोज दहा किलोमीटर पळायला सुरुवात कर – बघ कसा टुणटुणीत होशील ‘ – तसे हे होणार ! )

--- ००० ---

कोणत्याही धारणेचा सततचा हट्टाग्रह हा भयाचा निदर्शक असतो.

-- जे. कृष्णमूर्ती.

इकडे बिबवे वाडीत जोरात झाला मघाशी --

' वेटिंग फॉर गोदो ',  हातातून नेता येईल एवढ्या नेपथ्यावर सादर होऊ शकते --

राज ठाकरे-पवार यांनी नाटक भव्य करायला सांगितलेय -- ' मुगले आजम ' चे उदाहरण देऊन -- म्हणजे खूप गुंतवणुकीचे -- श्रीमंत --

' जाणत्या राजा ' नेच नाटक भव्य करायला सांगितलेय !

पवार-ठाकरे म्हणताहेत की भव्य करा --- अजून झालेले नाहीय --

राज ठाकरे आणि शरद पवार म्हणताहेत त्या अर्थी सादरीकरण असावे -- त्यांनी ' मुगले आजम ' चे उदाहरण दिले आहे --

Sharad Deshpande सर्व वाचले -- तिथे इंग्लिशला ऑक्सफर्ड विद्यापीठातून एमे झालेल्या होमाई जे श्रॉफ या होत्या -- त्यांच्याकडून काही शिकायला मिळावे म्हणून मी त्या कॉलेजात गेलो. त्यांच्याकडून ' मॅक्बेथ ' आणि ' कँटरबरी टेल्स ' हे शिकता आले, हे निव्वळ माझे भाग्य !

अरे वा ! आणखी एक माहिती म्हणजे, बा सी मर्ढेकर, पु शि रेगे आणि शंकर वैद्य हे मराठीतले तीन कवी तिथे वेळोवेळी शिकवायला होते. त्या कॉलेजच्या वार्षिकाचे ' पाम्स ' -- PALMS -- हे नाव मर्ढेकरांनी दिलेले आहे. मी विद्यार्थी असताना तिथे वैद्य सर होते. त्यांनी मला खूप प्रोत्साहन दिले !
ते कॉलेज टेकडीवर आहे. फुल निसर्ग ! तिथे अनेक हिंदी चित्रपटांचे चित्रीकरण होत असे. आता, मनुष्यप्राण्याने आणि विशेषतः त्यातल्या पुढारी या जातीने ते सगळे पुरेसे घाण केले असेल याची खात्री वाटते !

त्यांच्या डाव्या दृष्टीचे ऑपरेशन झालेय -- आता ते समतोल दिसतील !

पण, पवारांच्या मते, आघाडीचा नेता सध्या ठरवायचाच नाहीय -- तो नंतर लोकशाही पद्धतीने ठरेल !

असे करणारे सगळे वर्चस्ववादीच असतात ! पण, ही पोस्ट जरा मानसिक समस्येबाबत आहे !

वा ! हे गाणे इतक्या वर्षांनी पुन्हा पाहताना वेगळीच मजा आली !

१९६० चा सिनेमा -- त्या परदेशी अभिनेत्रीचे नाव -- मारिया मेनाडो. ( ‘ सिंगापूर ‘ )

मी वाचला आहे तो लेख. याच विषयावर माझा एक सविस्तर लेख ' खेळ ' च्या अलिकडेच प्रसिद्ध झालेल्या अंकात आलेला आहे. त्यामुळे, खरे तर मी पुन्हा इथे लिहायला उत्सुक नव्हतो. तरीही, आज-उद्या माझे मत थोडक्यात मांडेन.

तुमची अशी सेव्ह केलेली फळे ताजीच्या ताजी राहतात, हे विशेष आहे !

१०० टक्केवली १२५ मुले आहेत म्हणे !

उदाहरणार्थ काही प्रश्न -- मानवी समूहांत सारखी फूट का पडते, काही थोडे क्षण सोडता माणूस सतत त्रस्त आणि दुःखी का असतो, संघर्षमय जगणे अटळ आहे का, ध्येय आणि महत्त्वाकांक्षा यांच्याशिवाय जगता येणार नाही का, सतत कसली ना कसली अस्मिता बाळगायची गरज का पडते, वगैरे.

मी किर्लोस्कर प्रेसमध्ये काही महिने होतो -- तेव्हा श्रीभांबरोबर काम केले होते ! उत्तम दिलखुलास मित्र आणि उत्तम संपादकीय कौशल्ये असलेला माणूस !

दिङ्मूढ असणे -- हीही एक भूमिकाच !

इथे संस्कृती म्हणजे गणेशोत्सव आणि सत्यनारायण !

एकाच धर्मातून निघालेल्या जाती, पंथ यांच्या अस्मिता वेगवेगळ्या असू शकत नाहीत ? इतरही धर्मांत हे दिसेल --

मग, मी वेगळे काय म्हटलेय ? दोघेही फॅसिस्टच --

भाषावादीही फॅसिस्ट असू शकतो -- जरा सर्च केलेत तर नेटवर खूप माहिती मिळेल --

फॅसिस्ट ही वृत्ती असते -- अस्मिता आणि द्वेष यांचे मिक्स्चर -- तुम्हाला माझ्या दुखण्याची का चिंता ? आपण एका विषयावर बोलतोय -- व्यक्तिगत नाही --

म्हणजे फक्त ब्राम्हणच जातवादी आहेत, बाकी कुणी नाहीत -- असे म्हणताय का ?

म्हणून तर महाराष्ट्र पुरोगामी !

कुणावर हल्ला करावा वा कुणाला दुखवावे, हा हेतू नसतो, पण, एखादा प्रश्न समजून घेताना कुणी दुखावले जाऊही शकते -- पण, असो -- तुमची मर्जी --

सगळ्याच जातीवाद्यांबद्दल आहे ही पोस्ट --

नितिन भरत वाघ चिडू नका हो -- राग येत असेल तर माझे वाचू नका --

मूळ सुचलेली पोस्ट -- जातवादी फॅसिस्ट असतो की नसतो -- इतपतच काही होती ! जातवाद्याने धर्मवाद्याला फॅसिस्ट म्हणणे म्हणजे उघड्याने नागड्याला नागडा म्हणण्यासारखे आहे, इतकेच !

धर्मवादी, जातवादी हे सगळे फॅसिस्टच असतात, एवढेच म्हणायचे आहे -- दुसरी गोष्ट म्हणजे, चला जातिअंताला असे म्हणून यात काहीच फरक पडणार नाही कारण हे मानसिक प्रभावग्रस्ततेचे प्रश्न आहेत. तिसरे म्हणजे सामाजिक-ऐतिहासिक अंगाने अभ्यासपूर्वक लिहिण्यात मी कधीच वेळ घालवलेला नाही --. मी तसला विद्वानही नाही. आपल्या जगण्यातल्या ऍब्सर्डिटींना व्यक्त करणे, हे मी करत असतो. विद्वान लोक खूप आहेत, ते तुमच्या अपेक्षा पूर्ण करत असतातच. यात संदर्भ वगळलेले नाहीत -- सरळ मानसिक प्रभावग्रस्तता, असे पाहावे. अशा प्रश्नांचे निराकरण तुमच्या-माझ्या मनातच, झाले तर, होणार -- एखाद्या जाहीर सामाजिक चौकात मुळीच नाही.

बाकी कुणी नाही ? प्रश्न सगळ्या जातवाद्यांबद्दल आहे --

यात सगळे जातवादी आले का ?

यातूनच एक असाही प्रश्न येईल की ' फॅसिस्ट पुरोगामी ' अशी एक नवीच विभागणी सुरू करता येईल का ?

जाती आहेत आणि प्रत्येक जातीत काही जातवादीही आहेत -- त्या जातवाद्यांबद्दल आहे हा प्रश्न --

बोधामृत ? कुणीच कुणाला देऊ नये ! तुम्हाला काय पटत नाही ते मांडलेत तर त्यावर चर्चा होऊ शकेल -- पण, तुम्हीही बोधामृत सुरू करू नका --

किंवा -- बंदीला स्थगिती द्यायला कोर्टाचा नकार !

इथे हा प्रश्न जरा स्पष्ट करतो -- भाषेची समृद्धी ही वापरातून सिद्ध होत जाते -- उदाहरणार्थ सौंदर्यशास्त्राबद्दलचे लेखन प्रमाण भाषेत होते तसे बोलीत नाही होत. इंग्लिश भाषेने जितके अधिक विषय जितक्या असंख्य अंगांनी हाताळलेले असतात तसे काम मराठीचे नसते.

Champra Deshpande commented on Jayant Raghvendra Diwan's photo.

' चंप्र देशपांडे ! वैचारिक चर्चेला फेसबुकावर चालना देणारं व्यक्तिमत्व !!! '
-- धन्यवाद दिवाणजी आणि फ्रेंडस !

Language is central to our experience of being human, and the languages we speak profoundly shape the way we think, the way we see the world, the way we live our lives.
हा पुढील लेखाचा सारांश आहे --
HOW DOES OUR LANGUAGE SHAPE THE WAY WE THINK?
By Lera Boroditsky
पण या विषयात प्रचंड मतभेद आणि गोंधळ दिसतात ! तत्त्वज्ञान, मानसशास्त्र, भाषाशास्त्र -- सगळीकडेच यावर संशोधन चालु आहे !
आपण काय बोलणार ?
जय महाराष्ट्र !

विचारांचे वैविध्य, बारकावे, सूक्ष्मता, गुंतागुंत आणि पल्लेदारपणा -- हे सर्व विचारात घ्यावे लागेल.

सिर्फ हवा का रुख देखके किया हुवा ये ' भाकित ' समझो !

ही मस्त आहे सूचना -- टीव्हीवर वाद, मारामाऱ्या वाढल्याने गोंगाट होऊ लागला की ते बंद करून चीयर गर्ल्स दाखवायच्या !

ते वाक्य माझे नसल्याने अवतरण चिन्हात दिलेले आहे ! मी स्वतः शेयर बाजाराकडे ढुंकून पाहात नाही !

मूल्यात्मकतेमुळेच प्रस्तुतता येते -- त्यामुळेच, ' सिक्स कॅरॅक्टर्स -- ' आजही प्रस्तुत आणि मौल्यवान ठरते -- अनुभवाच्या प्रकारामुळे आणि पर्यावरणामुळे येऊ शकणारी प्रस्तुतता ही ' वैविध्यात ' जाईल.

कोणतीही बाजू घेऊन हिरिरीने भांडणारे -- सगळे भक्तच ! अंधश्रद्धही !

वैविध्य तर माणसागणिक असते अटळपणे -- कलेत फक्त तेच असते, असे मानले तर कोणतीही कलाकृती सर्व माणसांच्या जगण्यात प्रस्तुत होऊन मौल्यवान असणार नाही. ती प्रस्तुतता आणि मूल्यात्मकता कशामुळे येते, हा महत्त्वाचा प्रश्न आहे.

मूलभूत दर्शन ? -- सलील वाघांचा लेख वाचा --

ते जग हीच एक शाळा समजत !

आशावाद-निराशावाद असा नको विचार -- स्वीकारलीय ना लोकशाही मग तसे चालु द्यावे --

मग, आता प्रणवदांचे यावर बौद्धिक घेणे, हाच उपाय !

लोकशाहीवरही श्रद्धा नाही ठेवली तर राहील काय ?

एकजण ' तडपता ' असे गुणगुणताना ऐकला -- म्हणून पोस्ट दिली ! पत्नी माहेराहून परतल्यावर ' तडपता ' येत असेल ! ( दिल – धडकता ऐवजी तडपता – है मेरा आप के आ जाने से ).

या गाण्यावरचा एका काकांचा डान्स गाजतोय सध्या सगळीकडे --

गोविंदाच्या ' खुदगर्ज ' मधले गाणे.

मी तर अनेकदा, कविता लिहायची, हे आधी ठरवतो -- मग, त्या वेळी मनात येणारा एखादा निमित्त कण पकडतो आणि लिहायला सुरुवात करतो -- कविता पूर्ण होते !

Champra Deshpande replied to Girish Patke's comment.

आणि हेच आधी ' डावेदार ' म्हणून केले तेव्हा त्यात चेतन दातार आणि सीमा देशमुख होते. एकदोन प्रयोगांत, बहुतेक, वीणा जामकरही होती. अप्रतिम व्हायचे ते प्रयोग !

कविता, कथा अशा प्रकारांतून केलेले राजकारण म्हणजे साहित्य असा समज आहे अनेकांचा ! तो झुगारून देऊन लेखन होत राहायला हवे.

हलाखीच्या जीवनाचा अनुभव असलेलेच फक्त चांगली साहित्य निर्मिती करतात, असे नाही - असे माझे स्पष्ट आकलन आहे !

असला उपरोधिक दंडवत मी नाही स्वीकारत ! माझ्या इथल्या कॉमेंटस नीट वाचा -- मी इथे सातत्याने काय मांडत असतो, तेही आठवा -- असे चुकीचे अर्थ लावून मला नापास करायची घाई का करताय ?

काही न कळता बोलले की असे होते ! दारिद्र्य आणि हलाखी असा निकष असेल तर सर्वोत्कृष्ट साहित्य तिथून आले पाहिजे, असे म्हटलेय ! अनुभव कोणता आहे, हा सर्वोत्कृष्ट साहित्याचा निकष नसतो, असे मांडलेय ! तुमच्या अशा अज्ञानातून किंवा अज्ञान पांघरून तुम्ही मला नापास करत आहात याचा खेद होतो ! पण, तुम्ही काहीही, कशीही मते बनवू शकता ! पण, मी काय म्हणतोय ते समजून घेऊन मग नापास केलेत तर ते चर्चेच्या दृष्टीने अधिक योग्य होईल !

होय -- आणि ज्यांना लिहावेसे वाटते त्या सर्वांनी लिहावे -- कुणाला कंडेम करू नये -- एखाद्याची मर्मदृष्टी कधी जागी होईल ते सांगता नाही येणार.

एमिली डिकिन्सन कित्येक वर्षे तिच्या एका बेडरूमच्या बाहेर नव्हती पडली -- तरीही तिच्या कविता वॉल्ट व्हिटमनच्या कवितांच्या तोडीच्या समजल्या जातात ! लिहिण्याचा कस हा अनुभवावर अवलंबून नसून मर्मदृष्टीवर अवलंबून असतो.

माझ्या वॉलवर कोत्तापल्लेंच्या असल्याच एका विधानावर चर्चा चालु आहे -- तिथे यावरचे धुवांधार मुद्दे आलेले

आहेत --

सगळ्यांत दरिद्री आणि हलाखीचे जगणारी माणसे सीरिया आणि झिंबाब्वे इथे आहेत -- तिकडूनच येईल चांगले साहित्य ! इथल्या सगळ्यांनीच गप्प बसावे, हे बरे !

वटवाघुळाला पंख असतात पण पिसांऐवजी त्यांवर फर ( लव म्हणू ) असते, हा बारकावा आहे. खरे तर अशा कवितेत पाण्याचेही पीस असू शकते -- पण, या मुद्याने चर्चा नको म्हणून पक्षी बदलला आहे. ( वटवाघुळाला पंख असले तरी तो पक्षी नाही, हाही एक मुद्दा आहेच. ) धन्यवाद, Sanjay Bhaskar Joshi.

शेवटी जगण्याचा रेटा आपले काम करतच राहतो -- इतके लोक आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळांत घालतील असे काही वर्षांपूर्वी वाटत नव्हते.

नुसत्या बोलीच जिवंत ठेवायच्या -- असे काही करता येईल का ? सगळेच फक्त आपापल्या बोलींतच बोलु लागले तर नुसते आवाज येतील -- कुणालाच काही कळणार नाही ! -- हा प्रश्न फक्त प्रमाण भाषेनेच सुटू शकतो ! ती अधिक व्यापक, समावेशक कशी करायची, याचा विचार जरूर व्हावा.

माणूस जगतो म्हणजे कोणत्या ना कोणत्या संबंधांतच असतो. अनुभवच नाही, असे जगणे असू शकत नाही. कोणताही अनुभव जागतिक दर्जाचा वगैरे नसतो. सनसनाटी अनुभव म्हणजे दर्जेदार लेखन, हे खरे नाही.

होय तेच तर ! आणि तसे ते भेदणे हे अनुभव कोणता आहे यावर अवलंबून नसते.

त्याच विषयावर लिहायला हवे, असे नाही -- माझी कॉमेंट कृपया पुन्हा वाचावी --

मला हे नाही पटत. इथल्या माणसाने स्नोच लिहिण्याची गरज नाही पण मानसिक चाकोरी भेदणारे इथलेच लिहिले तरी ते जागतिक असेल -- अनुवाद होणे न होणे वेगळे --

समाजाने वा भूतकाळाने लादलेले फालतूच असणार. मला वाटते, ' मौल्यवान चाकोरी ' असे काही असू नाही शकत. कधीही झाले तरी कलावंताची आकलनप्रक्रिया ते भेदणारीच असावी लागेल. सामूहिक प्रयत्नाने कष्टपूर्वक साध्य होणारी ही

गोष्ट नाही. त्यामुळे, ते कधीही घडू शकेल. अमुक वर्षे लागतील, असे नाही. कोणताही समाज कलावंताला अनुकूल भूमी कधीच तयार करून देणार नाही.

Champra Deshpande commented on Jayant B. Joshi's photo.

'Today's drawing, "A peep into blank mind" Soft pastels and coloured pencils on paper, approx. 12 X 16 inches'

माणूस, उंदीर, मांजर अशा प्राण्यांचे तुटके अवयव अत्यंत दाटीवाटीने एकत्र. काहीच समान नसलेले सगळे. रंग निळसर -- टिकलेला, जुना आणि उडालेला. हे आठवणींचे गठ्ठे. इतके बिलगून राहण्यातून दिसणारी भीती. डावीकडे जणू माणसाचा एक कृत्रिम पाय. हिंसा, नाश आणि एकाकीपणा यांचा प्रत्यय. सहज डोकावले तरी दिसणारे मनाचे हे ओबडधोबड आकारांचे ढोबळ चित्र ! म्हणजे आत आणखी काय, कसे असेल ! एका जुनकट वेदनामयतेचे स्थिर-चित्र !

सर्जकतेत देणेघेणे नाही -- तुम्हाला स्वकेंद्र घट्ट शाबूत ठेवून सगळे अर्थ पाहायचे आहेत, असे दिसते --

कोण देणार ? स्वकेंद्रच नसल्यावर ? ( आपले याकडे पाहणे वेगवेगळे आहे. )

आस्वादकतेत स्वतःचा कंट्रोल केंद्रस्थानी असतो -- सर्जकतेत तो कंट्रोल नसतो --

वैश्विकता ही अनुभवात असते की मर्मदृष्टीत -- हा प्रश्न विचारात घ्यायला हवा.

दरम्यानच्या काळात ' अमृतानुभव ' वा ' चांगदेवपासष्टी ' चालतेय का बघा ना --

ज्याचा शेवट गोड ते सारेच गोड ! जय महाराष्ट्र !

'दुर्बोधता, पु. शि. रेगे आणि १९६० साल श्री पु. शि. रेगे यांनी १९६० साली छंदच्या मार्च-एप्रिलच्या अंकात 'नवे काव्य आणि जुना गाळ' या शिर्षकाचा एक लेख लिहिला होता. त्यात ते म्हणतात - "कविता सार्थ असली पाहिजे. तिच्यातील आशय कळला पाहिजे. म्हणजे नेमके काय झाले पाहिजे? ...वस्तुतः जी शुद्ध भावकविता असते ती कुठलाही व कसलाही अर्थ सांगण्याकरिता लिहिली जात नसते. आज जी कविता - मुख्यतः नवकविता - लिहिली जात आहे ती केवळ विशिष्ट भावानुभव अनन्यसाधारणपणे साकार करण्यासाठी म्हणून... जीवनाच्या विविध, व्यापक व संमिश्र अनुभवविश्वातून

काव्यप्रतिभेने जो कोणता अनुभव टिपला असेल तो आशयाभिव्यक्तीच्या अभिन्नपणाने व्यक्त करणे हाच तिचा जीवितहेतू आहे आणि तीच त्याची फलश्रुती... नवकवितेच्या बाबतीत मुख्यार्थ, लक्ष्यार्थ व व्यंग्यार्थ असली भाषा व्यर्थ ठरते यामुळे. जीवनातील सर्व अनुभव सरळ, स्पष्ट नि सुसंगत असतात का? नसतील तर त्यांना मुद्दाम स्पष्ट नि सुसंगत करण्याने त्यांचे मूळ स्वरूपात दर्शन होईल काय? नवकविता व्यक्त करू पाहते ते अनुभवच इतके संमिश्र, गुढ आणि क्वचित अस्पष्ट असतात की त्यांना साकारू पाहणारी कविताही तितकीच संमिश्र, गुढ वा अस्पष्ट झाल्यास नवल नाही. नवकवितेकडे पारंपरिक दृष्टीने व व्यवहाराच्या, उपयुक्ततेच्या व वाचकाच्या सोयीच्या वगैरे कालबाह्य अपेक्षेने पाहणाऱ्यांना ती दुर्बोध वाटते." रेगे यांना १९६० साली पडलेल्या - कविता सार्थ असली पाहिजे. तिच्यातील आशय कळला पाहिजे. म्हणजे नेमके काय झाले पाहिजे? - या प्रश्नाचे त्यांनी त्यांच्यापरीने उत्तर द्यायचा प्रयत्न केला परंतु या प्रश्नाला निर्णायक उत्तर आपण देऊ शकलो नाही, असे दिसते. कारण अजूनही बहुतेक समीक्षक याच प्रश्नाशी घुटमळत आहेत आणि ते अजूनही कवितेत वाच्यार्थ शोधतात. (रेगे यांच्यापुर्वीही हा प्रश्न उपस्थित होतच असे पण माझ्या हाती जो संदर्भ लागला तो पुढे ठेवून मी विचार करतोय.)'

-- खूपच महत्त्वाचा विषय --

तसा नाही होत अर्थ -- कवितेकडे तार्किक पद्धतीने पाहण्याबाबत आहे ते वाक्य --

इथे चाललेले वाचणे हे माझे कर्तव्य आहे -- त्याला इथे ' लाईक ' हा शब्द आहे -- मै कुछ नही कर सकता !

काहीजण म्हणतात की रोमँटिसिझम, म्हणजे मराठीत ' स्वच्छंदतावाद ', आता कालबाह्य झाला आहे. मला असे दिसते की जगाच्या पाठीवर कुठेही, काहीही जे जे मानवी मनाच्या कक्षेत आलेले आहे ते कधीच कालबाह्य होत नाही. हे दर्शवण्यासाठीच मधूनच अशी एखादी स्वच्छंदतावादी पोस्ट ! ( हीही कुठे पोचली तर बेश्टच ! )

'...पहिल्या पावसाची सर अचानक आली तेव्हा ती भिजत चिंब तशीच उभी राहिली. देवळाच्या आवारात त्याच्याबरोबर फिरताना तिनं सहज एक उत्सवाच्या नाचाची गिरकी घेतली आणि क्षणभर नसलेली वाद्यं तालावर घुमू लागली.."सावित्री…" पु.शि.रेगे लिखित प्रयोगशील कादंबरीचा एकपात्री रंगमंचीय आविष्कार रौप्य महोत्सवी प्रयोग - मडगाव गोवा'

-- खूप शुभेच्छा !

काहीजण याच पदार्थाला डाळफळे म्हणतात -- आमच्याकडे ही सर्वांचीच आवडती डिश -- मधून मधून असतेच !

विश्वकोशही बघावा लागेल --

मी तुझी इतकी स्वप्ने पाहात आलोय की तुझे सत्य आता अस्तित्वातच नाहीय.

-- रॉबर्ट डेस्नॉस.

इथे सतत काटेकोर मूल्यमापनाची अपेक्षा नसावी -- आपल्या मते ५० गुण असणाऱ्याचे ७० गुणवाले कौतुक करायला काहीच हरकत नाही. आणि दुसऱ्यांचे कशाला, आपण सगळे तेच करत असतो !

कर्मकांडविरहित धर्म महत्त्वाचाच !

"If you're lonely when you're alone, you're in bad company."

— Jean-Paul Sartre.

- आणि त्याच रूटीनचा भाग म्हणून कलानिर्मितीही करतो ! मग, कंपूबाजी अटळ ! पण, खूप मौल्यवान समजले गेलेले जगातले अनेक कलावंत याकडे असे सुखदुःखाचे रूटीन म्हणून नाही पाहात ! बुद्धाने घेतलेला शोध काही कलावंतांनाही महत्त्वाचा वाटतो ! तिथे कंपूबाजी उलट अडथळा ठरते !

लेखनापेक्षा यशाला महत्त्व दिले की कंपूबाजी अटळ ! अन्यथा, कलावंताला एकटे असणेच महत्त्वाचे !

सरळ ट्रॅजिकॉमिक किंवा ब्लॅक ह्यूमर सुरू करा -- कटकटच नको !

हे ' प्रजावाणी ' नाही -- ' प्रजामित्र ' होते. बहुतेक चिमणलाल पटेल नामक कुणी संपादक होते.

इंग्रजी वाङ्मयाचा माझा पहिला संबंध त्याच दैनिकामुळे घडला. हेमिंग्वेची ' फॉर हूम द बेल टोल्स ' आणि मॉमची ' द रेझर्स एज ' या दोन कादंबऱ्यांचे अनुवाद क्रमशः त्यात आले होते. ते मी अत्यंत मन लावून वाचत असे --

मी विश्वास ठेवतोय, असे समोरच्याला वाटले पाहिजे, यावर तेव्हापासून माझा कटाक्ष होता ! आजही आहे !

हा माझ्या एका नाटकातला संवाद आहे -- हा प्रश्न मुलाखतीत विचारला जात असतो, तर बाहेर गेल्यावर एक उमेदवार म्हणतो, " आत एक च्युत्या बसलाय -- तो विचारतोय की केशवसुताच्या बापाचं नाव काय -- आयला, काय पण असू शकेल -- रमेश, सुरेश -- "

तेंडुलकरांना नियतिवाद मान्यच होता !

या निमित्ताने काही मुद्दे उपस्थित केले आहेत -- ज्यानेत्याने विचारात घ्यावेत -- कला ही कशाचे माध्यम आहे, हा प्रश्न येणारच ना --

सामान्य प्रतिक्रिया निर्माण करणे हेच कलेचे काम आहे का, हा प्रश्न विचारून झालेला आहे --

एखाद्या निष्कर्षाला पोचणे झालेच पाहिजे असे नाही -- या निमित्ताने, यात इतके मुद्दे आहेत, हे समोर येणे खूप झाले !

हिंसेचे सगळेच विषय रिलेव्हंट असतातच ना --

ही विशिष्ट नाटके का महत्त्वावची ठरतात ? कुणालाही ?

त्याबाबतचे निरनिराळे विचार ? तसे तर कशानेही शक्य आहे -- या हिंसाभिव्यक्तीने कोणते आकलन होते ?

लेखन प्रकार नाकारणे नाही चाललेले -- या निमित्ताने कलेच्या कार्याचाही विचार चालला आहे --

निरनिराळ्या प्रकारच्या हिंसेला अभिव्यक्ती देऊन प्रेक्षकांना भयचकित करणे, स्तिमित करणे, सुन्न वा दिङ्मूढ करणे किंवा त्यांवरच्या संवादांनी त्यांना गुंगी आणणे यांतून आकलनाची कोणती प्रक्रिया घडते, असा प्रश्न आहे.आता तर अशा हिंसक घटनांच्या बातम्यांचा धबधबाच चालु असतो रोज. हिंसेच्या नाटकांना वा बातम्यांना सामान्यतः भयचकित होण्याच्या प्रतिक्रिया येतात. त्याच प्रतिक्रिया सारख्या जाग्या करत राहणारी अभिव्यक्ती कोणते सांस्कृतिक कार्य करते, असा प्रश्न आहे. की जगताना येणाऱ्या प्रतिक्रियांचा पुनःप्रत्यय देत राहणे, हेच कलेचे काम आहे ?

टीव्हीवरच्या दुसऱ्या एका मुलाखतीत त्यांनी ' नियतिवाद ' निःसंदिग्धपणे मान्य केला होता !

एबीपी माझा वर -- सं ५ वा पुन्हा आहे --

तुमच्या खास सोयीसाठी, ' कोणतीही साधने वा पंचमहाभुते न वापरता ' असे जरा वाढवून घेऊ या !

भाषेच्या वापराचे प्रकार वेगाने बदलत आहेत. चित्र आणि प्रतिमांवर आपण अवलंबून आहोत. मात्र, बदलत्या तंत्रज्ञानामुळे लिखित भाषेचे स्वरूप बदलु लागले आहे. हा बदल आणि प्रतिमांवरचे अवलंबित्व यांमुळे नजिकच्या तीस वर्षांत जगभरातील सहा हजारांपैकी चार हजार भाषा नष्ट होतील.
-- डॉ. गणेश देवी, भाषातज्ञ -- आज, दि १८-०५-१८ ची पुणे मटा पुरवणी पान २.

विनोद फोड करून सांगितला तर तो विनोद राहात नाही --

पूर्वी कसे, हत्ती ज्याला माळ घालेल तो राजा, असे होते ! त्याची ही काळानुरूप होणारी पुनरावृत्ती समजावी !

मग, एका अपक्षाच्या मतावर राज्याची दिशा ठरू शकते ! त्यासाठी त्याला मुख्यमंत्री करावे, म्हणजे झाले !

असे सर्वांनाच काही काही आठवत असते ! सगळेच बुद्धिमान हो ! लोकशाहीत, फक्त अमुकच तेवढे बुद्धिमान, असे काही नसते !

अहो, मग काँग्रेसला प्रश्नच नसता आला ना -- समोर जे आहे त्यावर बोलतोय आपण --

आता लिंगायत म्हणताहेत म्हणे की वक्कलिंगांचे राज्य नको !

लोक आठाठशे रुपयांची तिकिटे काढून हाऊसफुल करताहेत नाटक -- म्हणजे लोकांना हवेय हे असे ! म्हणजे व्यवसायाचे गणित खरे ठरतेय ! यात बाकी कुणाचे काहीही म्हणणे असून उपयोग काय ?

मानवी जगणेच भयानक आहे, हे वारंवार ठसवत राहण्याचा हा प्रकार होतो. पण, त्याचबरोबर तेंडुलकर, त्यांच्या विचारांनी काही ' चांगले ' मानतात, असेही दिसते. मग शंका अशी येते की हा पारंपरिक नीतिकल्पनांचा पुरस्कार तर नाही ? त्यांना बाळ कोल्हटकरांची नाटके आवडत, असे त्यांनी म्हटल्याचेही आले आहे. त्याचा अर्थ हाच तर नसावा ?

बरोबर आहे -- व्यक्तिगत हिंसा आणि सामाजिक हिंसा अशी विभागणी होऊच नाही शकत -- मानवी मन म्हणूनच त्याकडे पाहायला हवे --

' मानवी मनातल्या वृत्ती-प्रवृत्तींचा शोध ' -- म्हणजे काहीच नाही ? हा शोध म्हणजे विविधताच ! अस्तित्व आहेच -- ते मान्यच आहे ! आता एकदा हे सगळे असे आहे आणि असणारच म्हटल्यावर ' भेदक कटाक्ष ' किती टाकत बसणार ?

नुसतेच " शोध घेतो " असे म्हणायची मराठीत पद्धत आहे -- कशाचा ते कुणी सांगत नाही --

Champra Deshpande commented on Girish Patke's photo.

'ज्येष्ठ नाटककार, कवी, विचारवंत व त्याहीपेक्षा उत्तम मित्र असलेल्या चंप्रंना वाढदिवसाच्या खूप साऱ्या शुभेच्छा !!'
-- धन्यवाद !

सगळेच सतत आनंदी असल्यावर तसे म्हणायची गरजच काय ?

रस्ते, पूल बांधणार, शोध लावणार, कविता लिहिणार, चित्रे काढणार -- सगळे चालुच राहणार आनंदाने ! सर्जकता म्हणजे अजून काय हवेय ?

इथे लगेच संघी समजतील -- त्यानेही काही फरक पडणार नाही, हा भाग वेगळा !

आणि मग तोही परमात्म्यात विलीन होऊन जाईल -- पुढचे कुणाला काही कळायचा प्रश्नच येणार नाही --

नियम १२ -- ए-कारान्त नामाचे समान्यरूप या-कारान्त करावे. उदाहरणार्थ -- फडक्यांना ( म्हणजे फडके यांना ) -- फडकेंना असे सामान्यरूप लिहू नये ---
-- मराठी लेखन मार्गदर्शिका -- यास्मिन शेख -- पान ७८.
-- सारांश, ' लाख्यांच्या ' हेच बरोबर आहे. धन्यवाद !

व्यावसायिक नीतिमत्तेचा भाग म्हणून अशा व्यावसायिकाला स्वतःचे मत ( असल्यास ) गुप्तच ठेवावे लागेल -- स्वमताला अभिव्यक्ती देणे हे अनैतिक आणि विचारस्वातंत्र्यविरोधी समजले जाईल !

आज यांना जखमी कर, उद्या त्यांना जखमी कर -- असे या व्यवसायाचे स्वरूप असले तरी, शांतता आणि बंधुता या तत्त्वांचाही प्रचार करण्याची या व्यावसायिकांना मुभा असेल !

या व्यवसायाला वकील व्यवसायासारखीच प्रतिष्ठा असेल -- हा व्यवसाय करणाऱ्याला विखार-प्रसारक असे म्हटले जाईल -- त्याची अद्याक्षरे विप्र अशी येत असली तरी तो फक्त ब्राम्हणांसाठी आरक्षित राहणार नाही -- सर्व जातिधर्मांच्या लोकांना यात मुक्त प्रवेश असेल !

अनेक बाजूंनी तीव्र विखारयुक्त लिहू शकणाऱ्याला विचारस्वातंत्र्यसम्राट ही पदवी दिली जाईल -- ही पदवी धारण करणाऱ्याला दुप्पट मोबदला मिळेल !

सतत एकच बाजू लावून धरणाऱ्याला विचारस्वातंत्र्यद्रोही समजले जाईल -- त्याला मोबदला मिळणार नाही -- तो विचारस्वातंत्र्यापेक्षा स्वतःच्या प्रामाणिकपणालाच अधिक महत्त्व देतोय, असे समजले जाईल --

एका व्यक्तीला जास्तीत जास्त तीन पक्षांच्या बाजूने विचारस्वातंत्र्य वापरता येईल -- त्याहून जास्त वापरल्याचे आढळल्यास तो गुन्हा ठरेल !

हा रीतसर व्यवसाय म्हणून मान्य असेल -- यावरचे उत्पन्न करपात्र असेल !

वेगवेगळ्या विचारस्वातंत्र्यांचे वेगवेगळे पैसे !

नाही तरी डोके बंद करायची सवय आहेच ना !

वेगवेगळ्या नावांनी वेगवेगळ्या पक्षांसाठी खाती उघडायची -- कुणासाठी कोणते खाते आहे, हे मात्र प्राणपणाने लक्षात ठेवायचे !

मी रूपांतरित केलेले " ट्रायल ' विजयच्या अजेंड्यावर आहे ! तो आमचा दोघांचाही जीवनगौरव असणार आहे ! ते घडायची वाट बघत मला रडायची वेळ येऊ नये, म्हणजे झाले !

तर रडावे लागेल -- प्रायोगिकमध्ये सगळीच कामे त्यालाच बिचाऱ्याला करावी लागतात ! ( उगीच आपली गंमत ! )

होय -- गांभीर्य आणि मजा -- दोन्ही मान्य !

नेट बंद होते, त्यामुळे, पोस्ट उशिरा दिली गेली आहे --

त्या लेखाच्या जोडीला माझा ' काव्यतत्त्व ' हा एक छोटा लेख वाचावा -- त्यात जरा अधिक स्पष्टीकरण दिलेले आहे. धन्यवाद !

पण, हा संसर्ग पसरतोय मुंबईतूनच, हे नक्की ! तरी मी सांगत होतो मुंबईतल्या लोकांना, " माझी नाटके बघा -- माझी नाटके बघा ! " ऐकले नाही !

पुण्याचे जर असे असेल तर कल्याणचे कल्याणच असणार !

कवी इतर सगळीकडे संवेदनशील असतात, पण, श्रोत्यांबद्दल मात्र पूर्ण असंवेदनशील !

सोनाली, तुझ्याकडून अनेकांना शक्ती आणि समजूत मिळत राहो, हीच सदिच्छा !

माझा अभ्यास शून्य आहे, पण, आंबेडकरांचा बौद्ध धर्म ' निर्वाण ' ही संकल्पना वगळतो, असे एका भाषणात ऐकले होते -- खरे काय आहे ?

सर्व माणसांचे सांस्कृतिक प्रवाह चालु राहणे हे सर्वांच्याच हिताचे आहे -- त्यासाठी विविधता खुल्या दिलाने स्वीकारायला हवी. लेख आवडला !

अंधश्रद्धा निर्मूलनवाल्यांकडे जाऊन ताबडतोब उतारा करून घ्यावा !

मी तर कधीच संपलोय -- बाकी सत्य तुमच्याकडे !

यावर तरी आपले एकमत झाले !

जगण्यातल्या अनेक अवस्था जाणवतात --

छानच ! यामुळे, मला एक मजेदार आठवण झाली ! आम्हाला मराठी शिकवणाऱ्या बाई फारच आत्मीयतेने आणि उत्तम शिकवत. शेवटचा तास होता आणि त्या बहुतेक विंदांची कविता शिकवत होत्या. त्या कवितेत ' घर अमुचे आकाश ' अशी एक ओळ होती. मी गंमत म्हणून म्हणालो की या ओळीचा उलटाही अर्थ लागू शकतो -- घर हेच आमचे आकाश -- असा ! या अनपेक्षित गंमतीशीर कलाटणीने वर्ग तर हास्यात बुडालाच, पण, आमच्या त्या बाईंना इतके हसू आले की त्यांच्या डोळ्यांतून पाणी आले ! तास संपल्यावर ' वंदे मातरम ' चालु असतानाही त्यांना हसू आवरत नव्हते ! आपल्या ग्रेट बाईंना आपण आज इतके हसवले, याचा मला प्रचंड आनंद झाला !

ठेवणे, पावणे -- असे व युक्त असेल तरच वू.

विक्रमी उडती सतरंजी !

" नाटकाचा शेवट अंगावर कशाला यायला हवा ? तो काय कुत्रा असतो का ? " असे मी एका भाषणात विचारले होते.

मनोवांछित म्हणजे दिशा आली --

कोणतीही गोष्ट अंतिम नसते आणि कोणत्याही गोष्टीच्या शक्यता संपत नाहीत, असे मला वाटते. व्यक्तीचा प्रवास वेगवेगळा चालु राहणारच. काहीजण म्हणतात, ॲब्सर्डिटीचा काळ संपला, अस्तित्ववादाचा काळ संपला -- तसे मला वाटत नाही.

कधी कधी कवितेच्या डोंगरापेक्षा त्यातले उंदिर अधिक मोठे असू शकतात !

हे सगळे लक्षात घेऊन प्रत्येक ' उघड्या पडलेल्या ' माणसाबद्दल निकाल कोण देणार, तेही स्पष्ट व्हायला हवे --

कला जर रूटीनचाच भाग असेल तर मग कलेला मूल्यात्मकता कशामुळे येते ?

माझे तर असे म्हणणे आहे की मूल्य एकच असू शकते -- अनेक मूल्ये म्हणजे समजुती -- त्यांच्यांत संघर्ष होऊ शकतात --

माणसगणिक समजुती वेगवेगळ्या असू शकतील -- तशा समजुतींना मूल्य नाही म्हणता येणार --

खूप ठाम, परखड बोलणारा माणूस निर्णययशक्तीत कमकुवत असल्याने गोंधळलेला असणे -- असे चित्र दिसते -- हा माणूस स्वतःच्या क्लॅरिटीने गेला तर नक्कीच खूप महत्त्वाचा ठरेल ! ( राज ठाकरे ).

जगणे एकरेषीय नसते, याचे हे पुरावे !

कुणाचेही अंतःस्थ हेतू असे उघडे पाडणे, हे बरे नाही !

काहीच नसण्यातून काहीतरी निर्माण होऊ शकते का, असा प्रश्न आहे --

देशहितसाठी सत्ता हवी मग त्यासाठी देशहित बाजूला टाकावे लागले तरी चालेल !

जगण्याच्या सगळ्या मतभेद-चिंध्या झाल्यावर भव्य काहीतरी हवे ना !

समूळ आणि स्वच्छ आणि परखड !

शांतपणे जे जे योग्य वाटते ते ते करत जावे --

एकदा त्याग केल्यावर ट्यागून उचकवू नये !

जगातले दुःख असेच राहणार अशा खात्रीने त्यातल्या त्यात दुरुस्त्या करत राहणे ज्यांना महत्त्वाचे आणि शौर्याचे वाटत असेल त्यांना बुद्धाची कोणतीही सक्ती नाही -- बुद्ध आणि ख्रिस्त यांचा तौलनिक विचार एखाद्या विद्वानाने सांगावा लागेल --

दुःखातून मुक्त होणे शक्य आहे का याचा बुद्धाने शोध घेतला -- ज्यांना आहे तसे दुःखात राहणे आवडते, त्यांचा प्रश्न नाही !

" कविता ही एक शांततेची कृती आहे. "

लोकसंख्या, प्रदूषण, तापमानवाढ, दुसऱ्या ग्रहाची टक्कर, मानवनिर्मित शस्त्रात्रे, रोबोंचे वर्चस्व निर्माण होणे -- ही त्यांतली काही कारणे.

१०० टक्के सहमत ! या बाबतीत माझ्यापुरते मी एक समाधान शोधलेले आहे -- मी समजा कविता लिहितो, ती याआधीच्या सर्व कवींसह लिहितो -- ती माझी एकट्याची नसतेच -- तसेच, जगणे समजून घेण्याची प्रक्रिया या स्वरूपात असणारे साहित्य हे सर्वच मराठी वाचकांचे असते. तर एकूणात, यांतल्या कुणालाच याची गरज वा महत्त्व नसेल तर जाऊ दे मातीत ! त्या त्या वेळी आपल्याला वाटेल ते लिहीत राहायचे, इतकेच ! दुसरे म्हणजे, आमच्या प्रायोगिक नाटकाचे तत्त्व -- पाच प्रेक्षकांनी पाहिले तरी प्रक्रिया पूर्ण झाली !

केतकरांचे आणीबाणीबाबतचे विश्लेषण मला पटलेले होते. त्याबाबत मटामध्ये आलेले त्यांचे दोन लेख मी संग्रही ठेवलेले होते.

आता माझा शेवटचा मुद्दा -- टागोरांनी मुसोलिनीला पाठिंबा दिला होता हे आजच आपल्याला कळले. तत्पूर्वी ' गीतांजली ' उत्तम असे आपण दोघेही म्हणालो होतो ! आता हे पाठिंबा प्रकरण कळल्यामुळे ' गीतांजली ' च्या महत्तेत माझ्या दृष्टीने कवडीचा फरक पडत नाही ! पण, या माहितीमुळे टागोर तुमच्या लेखी आता बाद ठरतात का तो विचार करावा ! सांगू नका -- आपापले म्हणणे पुरेसे स्पष्ट झालेले आहे ! मैत्री आहेच आणि ती राहणारच ! असो -- सध्या धन्यवाद आणि बाय !

तुम्ही टागोरांना उत्तम म्हणता, साहित्यातल्या सर्व प्रवाहांचे स्वागत करता, साहित्य म्हणजे अमुकच वा अमुकच भूमिकेचे असले पाहिजे, असे म्हणत नाही -- मग आपल्यांत वाद काय आहे ? उलट तुम्ही तर देशमुख-देवी यांच्याशी मनमोकळी चर्चा करायला हवी !

Edit

Champra Deshpande commented on Shriranjan Awate's post.

तुम्ही टागोरांना उत्तम म्हणता, साहित्यातल्या सर्व प्रवाहांचे स्वागत करता, साहित्य म्हणजे अमुकच वा अमुकच भूमिकेचे असले पाहिजे, असे म्हणत नाही -- मग आपल्यांत वाद काय आहे ? उलट तुम्ही तर देशमुख-देवी यांच्याशी मनमोकळी चर्चा करायला हवी !

अहो, त्यांनी ' बाकी कुणी ' साहित्यिकच नाहीत, असे म्हणणे, हे नाही वाचत का तुम्ही ?

मी वर काही प्रश्न विचारले त्यांवर न बोलता नुसते शेरे मारून काय उपयोग ? मला आंतरविरोध मान्य नाही, असा समज तुम्ही कशावरून करून घेतला होता ? मी उलट, सर्व मानवी जगणे साहित्यात येणार म्हणतोय -- भूमिकावालेच बंधने घालताहेत -- अमुकशिवाय बाकीचे साहित्य नाहीच, असे कोण म्हणतेय ? मी ?

अहो, ते म्हणतात तेवढे सोडून बाकीचे साहित्यिकच नव्हेत, असे ते म्हणतात ना ! साहित्याच्या क्षेत्रात तुम्हाला व्यक्तीचे मूल्यमापन महत्त्वाचे वाटते आणि मला आशयाचे -- हा फरक आहे !

हे आणखी एक घ्या --

After returning to Paris, France in 1937, Genet was in and out of prison through a series of arrests for theft, use of false papers, vagabondage, lewd acts, and other offenses. In prison, Genet wrote his first poem, "Le condamné à mort", which he had printed at his own cost, and the novel Our Lady of the Flowers (1944).

In Paris, Genet sought out and introduced himself to Jean Cocteau, who was impressed by his writing. Cocteau used his contacts to get Genet's novel published, and in 1949, when Genet was threatened with a life sentence after ten convictions, Cocteau and other prominent figures, including Jean-Paul Sartre and Pablo Picasso, successfully petitioned the French President to have the sentence set aside. Genet would never return to prison.

झेने हा गुन्हेगार होता -- सार्त्र आणि पिकासोने त्याची रदबदली केली ! म्हणजे हे सगळे रद्द ?

आंतरविरोध संपुष्टात आलेला माणूस म्हणजे मृत किंवा तालिबानी असू शकतो -- नॉर्मल समजला जाणारा माणूस खूप आंतरविरोधांनी युक्त असतो ! या आंतरविरोधाकडे तुमची कमी वेगाची पॅसेंजर तर्कदृष्टी कसे बघते, ते जरा सांगा --

भारतात उदाहरणार्थ गुप्त मतदान मान्य आहे -- पण, एखाद्या कवीने प्रतिगाम्याला तर मत दिलेले नाहीय -- हे कळल्याशिवाय तुम्ही त्याची कविता वाचणार कशी ? मतदान कुणाला केलेय हे सांगितल्याशिवाय साहित्यात प्रवेश बंद ?

कार्ल युंगने सांगितलेला वेगळेपणा नाकारताय का तुम्ही ? साहित्यात / कलेत भूमिका नाकारली जाण्यात सर्जकतेची उत्तुंगता असते, असे म्हणतोय तो -- तुम्ही तर भूमिकेचा ठोकळा असणे हेच सर्जक मानताय !

सुसंगत, एकसंध भूमिकेचा स्वयंचलित रोबोसारखा माणूस असतो ?

अहो, माझे मत सांगण्यासाठीच तर ते उद्धृत दिलेय -- त्यांनी सर किताब परत करणे हीच भूमिका साहित्यात नाहीय -- साहित्यात ते पूर्ण मानवजातीच्या अवधानाशी बोलताहेत -- As a human being he may have moods and a will and personal aims, but as an artist he is 'man' in a higher sense - एझ्रा पाउंडने हिटलर, मुसोलिनी यांना पाठिंबा दिला -- तरीही, अर्नेस्ट हेमिंग्वेच्या मते तो ग्रेट कवी आहे !

सध्या ठीक -- जरा बाहेर चाललोय --

तुम्ही तो लेख प्लीज पुन्हा एकदा बघाल का ? फक्त अमुकच म्हणजे बाकीचे नाही -- असा अर्थ नसेल होत तर काय होतो ?

Champra Deshpande commented on Shriranjan Awate's post.

The artist is not a person endowed with free will who seeks his own ends, but one who allows art to realize its purposes through him. As a human being he may have moods and a will and personal aims, but as an artist he is 'man' in a higher sense - he is 'collective man,' a vehicle and moulder of the unconscious psychic life of mankind. (Carl Jung, Psychology and Literature, 1930)

हे मला पटत असल्याने अलिकडेच मी ही पोस्ट दिली होती.

मग, आपल्यांत वाद्च नाहीय -- तुमचे, देशमुख आणि देवी यांच्याशी मतभेद दिसतात !

म्हणजे ५० टक्के लोकसंख्या आणि ९० टक्के साहित्याचा आशय हा साहित्यच नाही, असे तुमचे मत नाही ?

वरच्या पोस्टमध्ये टागोरांचे उदाहरण दिले आहे -- तर टागोरांच्या ' गीतांजली ' बद्दल काय वाटते, तेही सांगावे.

यावर खरे तर बरीच चर्चा झालेली आहे -- कनाट्यांच्या पत्राला मी दिलेले उत्तरही कालच्या लोकसत्तामध्ये आलेले आहे. तरीही इथे थोडक्यात माझे विचार मांडेनच. माझा तो लेख अनेक लेखकांना आणि साहित्यप्रेमींना आवडलेला आहे. ' आमच्या मनातले बोललात ' असे अनेकजण म्हणाले आहेत. कालच्या माझ्या पोस्टवर कॉमेंट म्हणून राजन खान यांनी दिलेली त्यांची एक जुनी पोस्टही वाचावी. एकूणात हा काहीतरी हवेतून काढलेला विषय म्हणून याकडे  पाहू नये. समज-गैरसमज काही असतील तर जरूर क्लियर करू. पण, अमुकच फक्त जातिवंत साहित्यिक, अमुकच प्रकारे बलिदानाला तयार नसतील तर ते साहित्यिकच नव्हेत -- असे कुणी म्हणू लागले की प्रश्न येणारच. माझा लेख फक्त देशमुखांच्या भाषणावर नाहीय -- लेखाची सुरुवात वाचावी. एकीकडे, सगळे भूमिका घेतच असतात असे म्हणणारे, मग, भूमिका घ्या म्हणून सारखा धोशा का लावतात ? असे म्हणणाऱ्यांना पुरोगामी, प्रतिगामी, निराशेच्या, निरर्थकतेच्या, गोंधळलेल्या, वगैरे सर्वच भूमिका साहित्यात स्वागतार्ह वाटतात का ?

माझे बालपण विजापुरात गेले. तिथे आम्ही आजरेकर चाळीत राहात होतो. एकदा विविध गुणदर्शनाच्या कार्यक्रमासाठी वर्गणी मागायला आम्ही आजरेकरांकडे गेलो होतो. ते म्हणाले, ' वर्गणी देईन, पण, एका अटीवर -- तुमच्यापैकी कुणीही स श आणि ष हे तिन्ही मला म्हणून दाखवायचे ! " आमचा पराभव होऊनही त्यांनी वर्गणी दिली हा भाग वेगळा !

इथे पुरेसे स्पष्ट केले आहे -- पुढे ज्याचा त्याने विचार करावा -- मी काही जिंकायला निघालेला कुस्तिगीर वा वादवीर नाही --

जो भी है -- ठरवून काही नाही --

मौल्यवान कलाकृती समोर घेऊन विचार करून बघा --

कोणतीही सर्जक कलाकृती ही समताविरोधी, भेदभाव पोसणारी वा कमकुवतांबद्दल ' मरू देत ' वृत्तीची नसते -- क्रूरपणा आणि प्रगल्भता एकत्र असू शकत नाहीत --

सर्जकता म्हणजे पूर्वग्रहविरहितता -- म्हणजेच समता --

आत्मविश्वासही त्या मूर्खपणाचाच भाग !

Girish Patke's photo.

प्रकाश बुद्धिसागर या माझ्या परम मित्राने माझ्या या संहिता -- ' नातं ', ' दिनकर पुरोहितचा खून ', ' उत्सव ', ' संसाराणूपेंडघार ' -- सगळ्याच सादर करून हाईटला पोचवल्या ! नंतर हा फार्सिकल नाटकांचा किंग दिग्दर्शक झाला ! ( ' उत्सव ' म्हणजे ' सेक्स ' -- ) माझे नाटक व्यावसायिकवर पहिल्यांदा प्रकाशने आणले -- आणि माझा अभिमान म्हणजे -- प्रकाशचे पहिले व्यावसायिक दिग्दर्शन असलेले नाटक माझे होते -- ' पोत्यातून गोत्यात ' --

यातली गंमत तुमच्या लक्षात नाही आलेली -- निवडणुकांवर डोळा असेल तर सर्वांची निराशा करणारा कसा असेल अर्थसंकल्प ? एकूण गंभीर वातावरणातला हा एक हलकाफुलका विनोद आहे !

सतत इतिहासाच्या चर्चा -- हा आपला वर्तमान नरक आहे !

माणसाच्या बुद्धीने निसर्गाचा हेतू नाही सांगता येत !

" कोण्या कारणे हे जालेसे निर्माण । देवाचे कारण देव जाणे ।। " -- तुकाराम.

कविता कशाचे साधन आहे ? साध्य काय ?

गोष्ट तुझी. कविता आपली.

-- असे होते तेव्हाच तर ती कविता सर्वांच्या आयुष्यात प्रस्तुत ठरते !

कविता म्हणजे स्वतःच एकसंध होण्याची गाथा !

ही कविता त्या क्षणाशी पोचते ! पूर्ण एकसंध हृदयाने दाद !

वेदनेतून सौंदर्य-दर्शन !

हाच विषय एका वेगळ्या प्रकारे मांडणारा माझा ' नातं ' हा दीर्घांक वाचावा -- तो माझ्या खालील वेबसाईटवर उपलब्ध आहे --

www.champralekhan.com

कुत्रे ईमानदार असेल पण, त्याला अक्कल किती असते, या संशयावरच मी माझी एकूण कारकीर्द चालवत असतो !

प्रतिक्रियांच्या ! श्रेष्ठ-कनिष्ठ ! माझे मत म्हणाल तर कलेत अमुक प्रतिक्रिया श्रेष्ठ, असे काही असू शकत नाही !

कवींचा राग नाटककरांवर ? आणि नाटककारांचे म्हणाल तर संतोष गुजर, दत्ता पाटील, अजित देशमुख, युगंधर देशपांडे, प्रणव सखदेव, मनस्विनी लता रवींद्र, धर्मकीर्ती सुमंत -- अशी बरीच चांगली नावे आहेत !

सर्व कला मुळात काव्यच असतात म्हणून अशी सुरुवात !

बाजारबुणगे.

एका मराठी समीक्षकाने असे मांडलेय की बापाशी संघर्ष असणे हे अस्तित्ववादाचे अविभाज्य लक्षण आहे ! मी अजूनही ' चाट ' कंडिशनमध्येच आहे !

आजच्या बातमीप्रमाणे अध्यक्षमहाराजांनी पुन्हा एकदा सांगितलेय की अमुकच फक्त खरा लेखक !

डावे व्हा !

अरे वा ! अति-बेश्ट ! हातच्या कांकणाला आरसा कशाला -- असे झाले !

सामाजिक नाही म्हणून वैचारिक फेटाळणारे साम्यवादी आणि भावना दुखावल्या म्हणून आक्रमक होणाऱ्या या टोळ्या यांत काहीच फरक नाही ! या दोघांनाही राजकीय सत्ता मिळाली तर, त्यांना न पटणाऱ्या कलाकृतींबरोबरच त्या कलाकृतींच्या निर्मात्यांचीही हे खांडोळी करतील !

मला वेगळेच पडतात प्रश्न -- माणूस जर माकडातून उगवलाय तर मग सिंह कशातून आलाय ? गाढव वा साप आधी काय होते ? आणि मोर ? तो काय होता मुळात ?

सुखी भेळ जिवंत असणार -- ती खाता नाही येणार --

नाही -- मी ' सूंबाल्या ' बरोबरच केलाय !

झेकोस्लोवाकियाचा -- The Funny Old Man.